दैनिक राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २८०। शुक्रवार, दि.२४ जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## अल्पवयीन मुलाचे लैंगिक शोषण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिंगणापूर :** नेवासा तालुक्यातील खरवंडी येथील एका भोळसर अल्पवयीन मुलास खाऊचे अमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की एका ५० वर्षीय आरोपीने येथील एका ११ वर्षीय अल्पवयीन मुलास व त्याच्या आणखी दोन मित्रांना पैसे तसेच खाऊचे अमिष दाखवून आरोपीने त्यांच्या शेतातील कोपी मध्ये लैगिक शोषण केले. त्याचे दुसऱ्या मुला मार्फत मोबाईल मध्ये व्हिडिओ चित्रीकरण देखील या नराधमाने केले. तसेच सदर घटना बाहेर कुणाला सांगितली तर तुम्हाला मारुन टाकील अशी धमकी दिल्याचे नमूद फिर्यादी मध्ये म्हटले आहे. पिडीत मुलाच्या पालकाने दिलेल्या फिर्यादी नुसार आरोपी नुरखा बाबुलाल शेख (वय ५०) याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(उर्वरीत पान ४ वर)

# ‘पेपरफुटी’साठी फास्ट ट्रॅक न्यायालये!

## मोदींची घोषणा; मात्र धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कायम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आज ३४ दिवस पूर्ण झाले असून, या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रथमच सार्वजनिक भूमिका मांडली आहे. युवकांचे हित आणि भविष्य हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट करत, पेपरफुटीच्या सर्व प्रकरणांतील दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि खटल्यांचा तातडीने निकाल लागावा यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिल्याची माहिती त्यांनी 'एक्स'वरील संदेशातून दिली.

युवकांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या कोणालाही माफ केले जाणार नाही, असा इशाराही मोदी यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या हितसंरक्षणासाठी हा महत्त्वाचा निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान, काँकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली जंतरमंतरवर सुरू असलेले आंदोलन अद्याप कायम आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विद्यार्थी ठाम असून, सरकारशी अद्याप कोणतीही ठोस तोडगा निघालेला नाही. त्यामुळे आंदोलनाची कोंडी कायम आहे.

दुसरीकडे, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज २६ वा दिवस आहे. सध्या ते गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात उपचार घेत असतानाही त्यांनी उपोषण सुरूच ठेवले आहे. सरकारने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई होणार नाही, याची लेखी हमी दिल्यास उपोषण मागे घेण्याची सशर्त तयारी त्यांनी दर्शविली आहे.

वांगचुक यांनी सरकारला पाठविलेल्या पत्रात आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना भरपाई, संसदेत या प्रकरणावर चर्चा, जबाबदारी निश्चित करणे, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याचा विचार आणि आंदोलनकर्त्यांवर कोणतीही कारवाई न करण्याची मागणी केली आहे. सरकारने हमी न दिल्यास उपोषण सुरूच ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागा

**नीट पेपरफुटी प्रकरणातील नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारने देशातील विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी तसेच आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर कथित हिंसाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. त्यांनी शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त झाल्याचा आरोप करत यासाठी केंद्र सरकारलाच जबाबदार धरले आहे.**

## भेटीचा बहाणा...

## हॉटेलच्या खोलीत रक्तरंजित शेवट!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**लोणी / संभाजीनगर :** चार वर्षांपासून विभक्त राहत असलेल्या पतीला समेटाच्या चर्चेच्या बहाण्याने हॉटेलमध्ये बोलावण्यात आले आणि त्यानंतर त्यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रांजणगाव पोळ परिसरात उघडकीस आली आहे. राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथील जाबीर रफीक शेख (वय ३६) यांचा या घटनेत मृत्यू झाला असून, या हत्येमागे त्यांची पत्नी आणि तिच्या मामाचा हात असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या थरारक घटनेमुळे अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

**चार वर्षांपासून विभक्त असलेल्या पतीची निर्घृण हत्या**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जाबीर शेख आणि शबाना ऊर्फ शबाना जाबीर शेख यांचा विवाह सुमारे १५ वर्षांपूर्वी झाला होता. मात्र कौटुंबिक वादातून गेल्या चार वर्षांपासून दोघेही वेगळे राहत होते. सोमवारी (दि. २०) शबानाने चर्चेच्या निमित्ताने जाबीर यांना रांजणगाव पोळ येथील 'वेलकम' हॉटेलमध्ये बोलावले होते. जाबीर हॉटेलमध्ये पोहोचल्यानंतर काही वेळातच शबानाचा मामा कलीम मेहमूद पठाण (रा. सोनेसांगवी, ता. शेवगाव) तेथे आल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर हॉटेलच्या खोलीत जाबीर यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचा संशय आहे. हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी वैवाहिक वादातून हा कट रचण्यात आल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.

दरम्यान, जाबीर यांच्याशी संपर्क होत नसल्याने त्यांचे काका सज्जाक तस्ब शेख यांनी सुरुवातीला नेवासा पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. तपासादरम्यान घटना शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याचे स्पष्ट झाल्याने तपास तेथील पोलिसांकडे वर्ग करण्यात आला.शिल्लेगाव पोलिसांनी हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल कॉल रेकॉर्ड, तांत्रिक पुरावे आणि संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेण्यास सुरुवात केली आहे. संशयित पत्नी आणि तिच्या मामाचा शोध सुरू असून, तपासाला वेग देण्यात आला आहे.या निर्घृण हत्येने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वैवाहिक वादातून घडलेल्या या रक्तरंजित घटनेची सर्वत्र चर्चा सुरू आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून, लवकरच या हत्येचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## उपचाराअभावी दोन चिमुकल्यांचा मृत्यू?



दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे दोन तीन वर्षीय चिमुकल्यांच्या मृत्यूनंतर ग्रामस्थांचा संताप अनावर झाला. उपचारासाठी वेळेत म्बुलन्स उपलब्ध करून न दिल्याने दोन्ही बालकांचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करत ग्रामस्थांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप ठोकले आणि तालुका आरोग्य अधिकारी शैला डांगे तसेच वैद्यकीय अधिकारी

### वा रे न्याय... आणि वारे कायदा!

**लोणीमध्ये काहीही घडलं की पोलिस बळाचा वापर केला जातो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. दोन चिमुकल्यांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्याऐवजी गावकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न होत असेल, तर हा न्यायव्यवस्थेचा पराभव आहे. जर एका जरी गावकऱ्यावर गुन्हा दाखल झाला, तर पोलीस स्टेशनसमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा सभापती बाळासाहेब नाहटा यांनी दिला आहे.**

(उर्वरीत पान ४ वर)

## ठाकरे बंधूंचा २६ जुलैला मुंबईत विद्यार्थी न्याय मोर्चा

### नीट पेपरफुटी प्रकरणावर आक्रमक भूमिका; 'तिरंग्याखाली एकत्र या'चे आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** नीट पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून राज्यातील राजकारण आणखी तापले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत २६ जुलै रोजी छत्रपती शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर असा विद्यार्थी न्याय मोर्चा काढण्याची घोषणा केली.या मोर्चात कोणत्याही राजकीय पक्षाचा झेंडा नसून केवळ तिरंगा ध्वज असेल, असे स्पष्ट करत विद्यार्थी, पालक आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन दोन्ही नेत्यांनी केले.

राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांवरील कथित कारवाईवर तीव्र संताप व्यक्त करत, हा विषय आता केवळ शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापुरता मर्यादित नसून पंतप्रधानांच्या जबाबदारीचाही झाला असल्याचे म्हटले. सरकारने विद्यार्थ्यांचे आंदोलन समजून घेतले असते, तर आज ही वेळ आली नसती, अशी टीकाही त्यांनी केली. उद्धव ठाकरे यांनीही आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत पंतप्रधानांनी आंदोलक विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधायला हवा होता, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमार, न्यायव्यवस्थेची भूमिका आणि सरकारच्या धोरणांवरही त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सर्व पक्षांनी राजकारण बाजूला ठेवून एकत्र यावे, असे आवाहनही त्यांनी केले.



### घुसखोरीचा प्रयत्न झाला तर फटकावून काढू! - राज ठाकरे

**मुंबईतील विद्यार्थी न्याय मोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध असेल. या मोर्चात कोणत्याही राजकीय पक्षाचा झेंडा नसेल; फक्त तिरंगा असेल. मात्र, दिल्लीतील आंदोलनाप्रमाणे मोर्चात गोंधळ घालण्यासाठी किंवा घुसखोरी करण्याचा कुणी प्रयत्न केला, तर त्याला जागेवरच फटकावून काढू, असा स्पष्ट इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला. विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, तसेच मोर्च्याची शिस्त कायम ठेवावी, असे आवाहनही त्यांनी केले.**



## श्रीरामपूरमधील गुन्हेगारीवर पोलिसांची धडक कारवाई

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** कोपरगाव येथील एका युवतीला श्रीरामपूरमध्ये ४० दिवस डांबून ठेवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी सागर बेग, सोनू बेग आणि बाबू साळवे या तिघांविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पीडितेच्या फिर्यादीनुसार, बाबू साळवे याने जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीत तिला एका खोलीत डांबून वेळोवेळी अत्याचार केला. तसेच सागर व सोनू बेग यांनी बंदुकीचा धाक दाखवून बळजबरीने शरीरसंबंध ठेवण्यास भाग पाडले, असा गुन्हा श्रीरामपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

### सागर बेगवर गुन्हा दाखल

शहरातील वाढती गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी श्रीरामपूर पोलिसांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत सोनु बेग आणि गोरख जेधे या कुख्यात गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. त्यातच आता सागर बेग यांच्यावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाल्याने त्यालाही लवकरच अटक होण्याची दाट शक्यता पोलीस सूत्रांनी वर्तवली आहे. या घडामोडींमुळे बेग टोळीभोवतीचा कायदेशीर फास आणखी आवळला गेला असून, गुन्हेगारी वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

युवा व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या भरदिवसा झालेल्या खळबळजनक हत्या प्रकरणानंतर श्रीरामपुरातील नागरिक आणि गुन्हेगारीविरोधी संघटना आक्रमक झाल्या होत्या. या हत्येच्या निषेधार्थ सलग चार दिवस श्रीरामपूर बंद पाळण्यात आला, तसेच सर्वपक्षीय नागरिकांचा एक मोठा मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यादरम्यान आमदार हेमंत ओगले आणि प्रकाश चित्ते यांनी श्रीरामपुरातील गुन्हेगारीमागे 'बेग टोळी' असल्याचा थेट आरोप केला होता. याआधीच पोलिसांनी टोळीतील



प्रमुख गुन्हेगार सोनु बेग व गोरख जेधे यांना बेड्या ठोकल्या होत्या.वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे अपर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता, राज्य गुप्तवार्ताचे आयुक्त शिरीष जैन आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी श्रीरामपूरचा विशेष दौरा केला.यावेळी सर्वपक्षीय शिष्टमंडळाने या अधिकाऱ्यांसमोर बेग टोळीच्या गुन्ह्यांचा पाढा वाचला. बैठकीत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, अपर पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन आणि

(उर्वरीत पान ४ वर)

## पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला; वृद्धाचा मृत्यू, १० जण गंभीर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राहुरी / कोल्हार :** राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा येथे पिसाळलेल्या कुत्र्याने केलेल्या भीषण हल्ल्यात साहेबराव राघुजी वाघमारे (वय ७०) या वृद्ध व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, या घटनेत सुमारे १० जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साहेबराव वाघमारे हे घरासमोरील दुकानाजवळ झोपलेले असताना पिसाळलेल्या कुत्र्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. त्यानंतर कुत्र्याने परिसरातील अनेक नागरिकांवरही हल्ला चढवत त्यांना चावा घेतला.

घटनेची माहिती मिळताच जीवनदायी म्ब्युलन्सचे निखिल भोसले यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत गंभीर जखमी साहेबराव वाघमारे

(उर्वरीत पान ४ वर)

## अवैध वाळू वाहतुकीचे ४ ट्रॅक्टर ट्रॉलीसह पकडले: चौघाविरुद्ध गुन्हा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील पिंपरखेड येथिल अवैध वाळू वाहतुकीविरोधात जामखेड पोलिसांनी मोठी कारवाई करत चार ट्रॅक्टर-ट्रॉलींसह एकूण १६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या आदेशानुसार गुन्हे

(उर्वरीत पान ४ वर)

## आढळा धरण तुडुंब भरले

### सोळा गावचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील धांदरफळ, जवळे कडलग, पिंपळगाव कोंझिरा, वडगाव लांडगा, चिकणी, राजापूर, निमगाव भोजापूर व चिखली ही आठ गावे व सिन्नर तालुक्यातील चास नळवाडी व कासारवाडी दोन गावे अशा या १६ गावांना शेतीसाठी याच आढळा धरणातून पाणी मिळते याशिवाय अनेक गावांना पिण्यासाठीही या धरणातून पाणी दिले जाते त्यामुळे आढळा धरण भरणे परिसराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व गरजेचे आहेत.अकोले तालुक्यातील देवठाण येथील आढळा धरण गुरूवारी दुपारी पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी ओसंडून वाहते आहे. सांडव्यातून पाणी वाहू लागल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पसरले आहे. लवकरच शासकीय जल पूजनाचा कार्यक्रम होणार आहे अशी माहिती अकोले उपविभागीय अभियंता प्रीतम शेवाळे यांनी दिली.एकंदर १०६० दलघफू क्षमता असलेले हे धरण या वर्षी जुलै महिन्यात भरत असल्याने



छाया : सोमनाथ डोळे

शेतकरी बांधव प्रचंड खुश आहेत. रब्बी पिक व पिण्याचे पाण्याची व्यवस्था झाली आहे.दरवर्षी भंडारदरा व निळवंडे धरण भरल्यानंतर आढळा धरण भरण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागत असे.

(उर्वरीत पान ४ वर)

## वैद्यकीय प्रवेशात जागा अडवणाऱ्यांना सरकारचे 'इंजक्शन'!

### संस्थात्मक कोट्यात जागा निश्चित करूनही प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन वर्षे प्रवेशबंदी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत जागा अडवून ठेवण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. संस्थात्मक (इन्स्टिट्यूशनल) कोट्यातील प्रवेश फेरीत जागा निश्चित करूनही संबंधित महाविद्यालयात प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्षे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस अपात्र ठरविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता वाढविणे, गुणवत्ताधारित प्रवेशाला प्राधान्य देणे आणि जागा 'ब्लॉक' करण्याच्या प्रवृत्तीला आळा घालणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

गेल्या काही वर्षांत संस्थात्मक कोट्यातील प्रवेश प्रक्रियेबाबत अनेक गंभीर तक्रारी समोर आल्या होत्या. काही विद्यार्थी अखेरच्या टप्प्यापर्यंत जागा रोखून ठेवत असल्याने गुणवत्तेच्या आधारे प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागत होते. तसेच काही खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अधिकृत शुल्कापेक्षा मोठ्या रकमेची मागणी होत असल्याचे आरोपही झाले होते. सिंधुदुर्गमधील एका प्रकरणात संस्थात्मक कोट्यातील जागेसाठी तब्बल २.१ कोटी रुपयांची मागणी झाल्याचा आरोप चर्चेत आला होता.राज्य सरकारने आता केंद्रीकृत प्रवेश प्रक्रिया (कॅप) अधिक प्रभावी करण्याचा निर्णय घेतला असून नियमित फेऱ्यांसह स्ट्रे व्हॅकन्सी आणि त्यानंतरच्या अतिरिक्त फेऱ्यांनाही अधिक महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे रिक्त जागा गुणवत्तेनुसार भरल्या जाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### नवी नियमावली

- **संस्थात्मक कोट्यात जागा मिळूनही प्रवेश न घेतल्यास दोन वर्षे प्रवेशबंदी**
- **केंद्रीकृत (कॅप) प्रवेश प्रक्रियेला अधिक प्राधान्य**
- **स्ट्रे व्हॅकन्सी फेऱ्यांनाही अधिक पारदर्शक स्वरूप जागा अडवून ठेवण्याच्या प्रकारांना आळा**
- **गुणवत्ताधारित प्रवेश व्यवस्थेला बळ**
- **संस्थात्मक कोट्यातील आर्थिक गैरव्यवहारांवर नियंत्रणाची अपेक्षा**
- **कठोर नियमांसह प्रभावी अंमलबजावणीवर यश अवलंबून.**



(उर्वरीत पान ४ वर)

# बा विठ्ठला, आभाळ फाटले... ठिगळ लावू कुठे कुठे?

आषाढी एकादशी...

महाराष्ट्राच्या संस्कृतीतील सर्वात मोठा अध्यात्मिक सोहळा. लाखो वारकरी ''ज्ञानोबा–तुकाराम''चा गजर करत पंढरीच्या वाटेवर चालत आहेत. विठ्ठलाच्या दारात प्रत्येकजण सुख, समाधान आणि सद्बुद्धी मागतो. पण यंदा पंढरीच्या वाळवंटात उभे राहून विठुरायाल एकच प्रश्न विचारावासा वाटतो की ''बा विठ्ठला, आभाळ फाटले... ठिगळ लावू कुठे कुठे?''

कारण आज संकट एका घटनेचे नाही; संपूर्ण व्यवस्थेचे आहे. शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, राजकारण, कायदा–सुव्यवस्था, सामाजिक मूल्ये आणि नागरिकांची मानसिकता. प्रत्येक ठिकाणी तडे गेले आहेत. देश महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे; पण त्य स्वप्नाचा पाया असलेली नैतिकता मात्र दिवसेंदिवस ढासळत चालली आहे.

गेल्या महिनाभरात देशाने काय पाहिले? लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित नीट आणि टीईटी पेपरफुटीची प्रकरणे, प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांमुळे हादरलेली परीक्षा व्यवस्था, न्याय मागण्यासाठी दिल्लीतील जंतर–मंतरवर तब्बल महिनाभर बसलेले विद्यार्थी, त्यांच्यावर झाल्याचे आरोप असलेले लाठीचार्ज, समाजसेवक सोनम वांगचुक यांचे दीर्घ उपोषण, संसदेचे वारंवार ठप्प होणारे कामकाज आणि त्याच वेळी सुरू असलेले राजकीय आरोप–प्रत्यारोप. विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटले नाहीत; पण राजकारण मात्र रंगले.

देशभरात दरवर्षी कोट्यवधी विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जातात. एका परीक्षेसाठी अनेक तरुण दोन–दोन, तीन–तीन वर्षे आयुष्य झोकून देतात. घरची शेती विकणारे पालक, कर्ज काढून शिकवणी लावणारी कुटुंबे आणि स्वप्नांवर जगणारी तरुणाई... पेपरफुटीच्या एका




घटनेने त्यांच्या आयुष्याचा पाया हादरतो. हा केवळ गैरव्यवहार नाही; हा राष्ट्राच्या भविष्यावरील दरोडा आहे.

सर्वात मोठा प्रश्न म्हणजे सरकार आणि विरोधक या दोघांच्याही भूमिकेचा. सत्ताधाऱ्यांनी वेळेत संवाद साधला असता, तर परिस्थिती एवढी चिघळली नसती. दुसरीकडे विरोधकांनीही विद्यार्थ्यांच्या वेदनेला केवळ आंदोलनाचे राजकारण बनवू नये. विद्यार्थी मतदार असतील; पण त्याआधी ते देशाचे भविष्य आहेत.

दुसऱ्या बाजूला कायदा–सुव्यवस्थेची अवस्था भयावह आहे. श्रीरामपूरमध्ये केवळ जेवण उशिरा मिळाल्याच्या कारणावरून हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांची निर्घृण हत्या झाली. पुणे, मुंबई, अहिल्यानगर, बीड, ठाणे, नाशिकसह राज्यातील अनेक भागांत खून, अंमली पदार्थांची तस्करी, महिलांवरील अत्याचार, आर्थिक फसवणूक आणि टोळीगिरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. व्यापारी असुरक्षित आहेत, महिला भयभीत आहेत आणि सामान्य माणूस कायद्याच्या संरक्षणाबाबत साशंक आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या ाकडेवारीकडे पाहिले, तर दररोज कडो गंभीर गुन्ह्यांची नोंद होते. ायबर फसवणूक झपाट्याने वाढत आहे. महिलांविरुद्धचे गुन्हे, अल्पवयीनांवरील अत्याचार आणि आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण चिंताजनक आहे. प्रश्न एवढाच आहे की, गुन्हेगारांना कायद्याची भीती उरली आहे का?

आज समाजालाही आरशात हण्याची गरज आहे. नशेच्या आहारी जाणारी तरुणाई, सोशल मीडियावर द्वेष पसरवणारी मानसिकता, लाच दिल्याशिवाय काम होत नाही ही स्वीकारलेली संस्कृती आणि अन्याय दिसत असूनही ''मला काय त्याचे?'' म्हणत गप्प बसणारा नागरिक... हीदेखील या अधोगतीची कारणे आहेत. लोकशाही केवळ सरकारने वाचत नाही; ती जागरूक समाजाने जिवंत ठेवावी लागते.

आपण जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होण्याचे लक्ष्य ठेवतो. हा अभिमानाचा विषय आहे. पण प्रश्न असा आहे की, नैतिक दिवाळखोरीवर आर्थिक वैभवाचा महाल किती दिवस उभा राहील? रस्ते, पूल, विमानतळ, मेट्रो आणि डिजिटल व्यवहार हे विकासाचे निर्देशक असतील; पण न्याय, विश्वास, सुरक्षितता आणि चारित्र्य हीच विकसित राष्ट्राची खरी ओळख असते.

आषाढी वारीने महाराष्ट्राला शतकानुशतके समतेचा आणि माणुसकीचा संदेश दिला. संत तुकारामांनी सांगितले, ''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले.'' आज हा संदेश सत्ताधाऱ्यांपासून विरोधकांपर्यंत, न्यायालयांपासून प्रशासनापर्यंत आणि समाजापासून प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्याची गरज आहे.

आज विठ्ठलाकडे मागायचे असेल, तर सत्ता नको, संपत्ती नको, पद नको. मागायची असेल तर सद्सद्विवेकबुद्धी. कारण संवेदनशील शासन, प्रामाणिक प्रशासन, निर्भय न्यायव्यवस्था आणि नैतिक समाज यांच्याशिवाय विकसित भारताची कल्पना अपूर्ण आहे. म्हणूनच आषाढीच्या या पवित्र दिवशी विठुरायाच्या चरणी एकच प्रार्थना...

''हे पांडुरंगा, आमच्या समाजाला विवेक दे. सत्तेला अहंकाराऐवजी उत्तरदायित्व दे. प्रशासनाला प्रामाणिकपणा दे. न्यायव्यवस्थेला वेळेवर न्याय देण्याचे बळ दे. तरुणाईला योग्य दिशा दे आणि समाजाला माणुसकी दे. कारण आज आभाळ इतक्या ठिकाणी फाटले आहे की, एका ठिगळाने ते शिवले जाणार नाही. त्यासाठी संपूर्ण राष्ट्रालाच आत्मपरीक्षणाच्या सुई–दोऱ्याने स्वतःला पुन्हा शिवावे लागेल.''

अन्यथा पुढच्या आषाढीलाही वारकरी विठ्ठलाच्या दारात उभे राहून हाच प्रश्न विचारतील, ''बा विठ्ठला, आभाळ फाटले... ठिगळ लावू कुठे कुठे?''

# आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण
## गुन्हा दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी,:** संगमनेर तालुक्यातील कौठे–मलकापूर येथे आदिवासी समाजाच्या जमिनीवर अतिक्रमण करून पीडित कुटुंबाला जातीवाचक शिवीगाळ, जिवे मारण्याची धमकी तसेच महिलांशी अश्लील वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधितांवर अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह (अॅट्रासिटी) विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्याची मागणी 'एकलव्य संघटना महाराष्ट्र'च्या वतीने करण्यात आली असून, मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, कौठे–मलकापूर येथील गट क्रमांक १७/४० मधील 'भोगवटा वर्ग–२'ची सुमारे ६ हेक्टर ४० आर जमीन गणपत विठ्ठल पवार व त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची असून, १९५९ पासून तीन पिढ्यांपासून या जमिनीची मशागत केली जात आहे. गावापासून दूर असलेल्या या जमिनीवर कारभारी गणपत शिंदे व त्यांच्या मुलांनी बेकायदेशीर अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जमिनीबाबत विचारणा केल्यानंतर आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ करत महिलांशी अश्लील भाषा वापरली, जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या तसेच शेतात जाण्यास मज्जाव करून धक्काबुक्की व मारहाणीचा प्रयत्न केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याच गटातील दुसऱ्या व्यक्तीच्या आडनावातील साधर्म्याचा गैरफायदा घेऊन पवार कुटुंबाच्या जमिनीवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे.



या प्रकरणी तालुकाध्यक्ष अनिल बर्डे यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार सुभाष कदम, प्रांताधिकारी अरुण उंडे आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. संबंधितांवर अतिक्रमण, फसवणूक, विनयभंग व अॅट्रासिटीसह गंभीर गुन्हे दाखल करून पीडित कुटुंबाला तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाकडीतील विकासकामांचा झंझावात
## ग्रामपंचायत सदस्य अमोल शेळके यांच्या प्रयत्नांमुळे वॉर्डात विविध विकासकार्यांना गती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी :** राहाता तालुक्यातील वाकडी येथील युवा ग्रामपंचायत सदस्य अमोल शेळके यांनी आपल्या वॉर्डात अल्पावधीतच विकासाचा धडाका लावला आहे. सततचा पाठपुरावा आणि लोकाभिमुख भूमिकेमुळे त्यांनी वॉर्डात अनेक महत्त्वाची विकासकामे मार्गी लावली असून, त्यांच्या या तत्पर कारभाराबद्दल ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेळके वस्ती येथे वॉल कंपाऊंड आणि ब्लॉक बसविण्याचे काम पूर्ण,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांढरे वस्ती येथे वॉल कंपाऊंड आणि नवीन शौचालय निर्मिती,लहारे वस्ती शाळा येथे अंगणवाडी दुरुस्ती, नवीन पत्रे, किचन शेड तसेच पर्चीमध्ये फरशी बसविण्याचे कामे,लहारे वस्ती शाळा येथे चेन लिंक जाळी बसविण्याच्या कामास मंजुरी,नवीन वसाहत पांढरी वस्ती येथे रस्ता खडीकरण,लहारे वस्ती कॅनॉल रस्ता मुरूमकरण,जळगाव रोड ते नामदेव पाटील शेळके वस्तीवर जाणारा रस्ता मुरूमीकरण,वॉर्डातील पाणीपुरवठ्याच्या अडचणी दूर करून वेळेवर व सुरळीत पाणीपुरवठा,रावसाहेब बाबा शेळके घर ते घोडे वस्ती दरम्यान नवीन पाईपलाईन,वॉर्डातील बंद पडलेले सर्व हातपंप दुरुस्त,पांढरी वस्ती येथील दलित वस्तीच्या विकासासाठी १० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी,संपूर्ण अंधारमय वॉर्डात हंडी बल्ब (स्ट्रीट लाईट्स) बसवून प्रकाशव्यवस्था निर्माण करणे आदी विकासकामे अमोल शेळके यांनी घेतलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे वॉर्डाचा चेहरामोहरा बदलण्यास मदत झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय व गतिमान विकासकामांबद्दल संपूर्ण वॉर्डातून त्यांचे कौतुक होत आहे.



# घोरपडे यांच्या सोशल मीडिया पोस्टशी भाजपचा कोणताही संबंध नाही : अमोल भनगडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** नीट (छएएढ) पेपरफुटी प्रकरणी सुरू असलेल्या आंदोलनासंदर्भात सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आलेल्या पोस्टचा भारतीय जनता पक्षाशी कोणताही संबंध नसून ती संबंधित व्यक्तीची वैयक्तिक भूमिका आहे, असा खुलासा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस अमोल भनगडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.



भनगडे यांनी म्हटले आहे की, राहुरी येथील गोविंद घोरपडे नावाच्या व्यक्तीच्या नावाने सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आलेल्या पोस्टमध्ये व्यक्त करण्यात आलेली मते, आरोप किंवा भूमिका ही पूर्णपणे वैयक्तिक असून त्याचा भारतीय जनता पक्षाशी कोणताही संबंध नाही. संबंधित व्यक्ती सध्या भारतीय जनता पक्षाचा अधिकृत पदाधिकारी किंवा प्राथमिक सदस्यही नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात राहुरी वकील संघटनेशी संपर्क साधला असता अॅड गोविंद बाळासाहेब घोरपडे या नावाची व्यक्ती वकील म्हणून न्यायालयात अस्तित्वात नसल्याची माहिती मिळाल्याचा दावाही त्यांनी केला. त्यामुळे संबंधित पोस्टमधील नावाचा वापर करून भारतीय जनता पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचा आणि राहुरी भाजपची बदनामी करण्याचा विरोधकांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न होत असल्याचा आरोप भनगडे यांनी केला.

सोशल मीडियाच्या माध्यमातून चुकीची माहिती आणि दिशाभूल करणारे संदेश प्रसारित करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी अशा अफवांचा सर्वसामान्य नागरिकांवर कोणताही परिणाम होणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पक्ष हा जनतेच्या प्रश्नांप्रती संवेदनशील असून जबाबदारीने कार्य करणारा पक्ष असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कोणत्याही विषयावर भारतीय जनता पक्षाची अधिकृत भूमिका ही केवळ पक्षाचे अधिकृत प्रवक्ते किंवा पक्षाच्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारेच जाहीर केली जाते. त्यामुळे सोशल मीडियावरील वैयक्तिक पोस्ट किंवा अप्रमाणित संदेशांच्या आधारे पक्षाबाबत कोणताही गैरसमज करून घेऊ नये, असे आवाहन अमोल भनगडे यांनी नागरिकांना केले आहे.

# बाल विद्या मंदिर प्रशालेच्या दिंडीने राहुरी नगरी विठ्ठलमय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर कै. लालाशेठ बिहानी बाल विद्या मंदिर प्रशालेच्या वतीने आयोजित भव्य दिंडी सोहळ्याने राहुरी शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. ''ज्ञानोबा–तुकाराम''च्या अखंड जयघोषात, टाळ–मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या गजरात विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची परंपरा जिवंत केली.

दिंडीत विद्यार्थ्यांनी विठ्ठल–रुक्मिणी तसेच संत तुकाराम, संत सावता माळी, संत जनाबाई, संत बहिणाबाई आदी संतांची वेशभूषा साकारली. मार्गावर नागरिकांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करत पुष्पवृष्टी व औक्षण केले. शिवाजी चौक, शनी चौक आणि पृथ्वी कॉर्नर येथे रिंगण, फुगडी व विविध भक्तिमय उपक्रम पार पडले.

दिंडीची सांगता आनंद ऋषी गार्डन येथील विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात महाप्रसादाने झाली. नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. मुख्याध्यापक गुलाब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. या संस्कारमय उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, शिस्त, सामाजिक एकात्मता आणि भारतीय संस्कृतीबद्दल अभिमानाची भावना दृढ झाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.




# देवगड संस्थानच्या पंढरपूर येथील मठात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तीर्थक्षेत्र नेवासा येथून दि.८ जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरकडे निघालेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे बुधवारी दि.२३ जुलै राजी सायंकाळी देवगड संस्थानच्या पंढरपूर येथील मठामध्ये आगमन झाले. यावेळी माऊलींच्या या दिंडीचे देवगड संस्थानच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते गुरुवर्य भास्करगिरी बाबांचा सन्मानचिन्ह देऊन संतपूजन करण्यात आले.

यावेळी झालेल्या पालखीच्या स्वागत प्रसंगी हभप राम महाराज



झिंजूर्के,देवगडचे संतसेवक नामदेव महाराज कंधारकर,वेदमूर्ती भगवान महाराज जंगले शास्त्री, रामायणाचार्य नंदकिशोर खरात,अंकुश महाराज जगताप, नारायण महाराज ससे,गणपत महाराज आहेर, रामनाथ महाराज पवार,बाळू महाराज कानडे,तात्या महाराज शिंदे,लक्ष्मण महाराज नांगरे,शुभम महाराज बनकर, आदिनाथ महाराज पांगरे,रोहित महाराज पटारे,गणेश महाराज तनपुरे, शशिकांत महाराज कोरेकर, सोमनाथ महाराज पानकडे, उद्योजक दिनकरराव कदम,किरण धुमाळ,भाऊ कोकणे, कचरूतात्या भागवत,रामेश्वर तनपूरे,भीमाशंकर वरखडे, उमाकांत कंक,बद्रीनाथ फोलाणे,आदिनाथ जाधव, दामोदर पवार,ईश्वर मते, बंटीभाऊ पठाडे,यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळीभान येथील जिल्हा परिषद दाभाडे वस्ती शाळेकडे ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे गाव असून गावामध्ये जिल्हा परिषदेची एक मुख्य केंद्र शाळा व तीन वस्ती शाळा आहे. गावच्या विकासामध्ये चांगल्या दर्जाच्या शैक्षणिक सुविधा असणाऱ्या शाळा भर घालत असतात. जिल्हा परिषद शाळा या शैक्षणिक व्यवस्थेच्या मूलभूत पाया आहेत. परंतु या शैक्षणिक व्यवस्थेकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. यामध्ये गावातील दाभाडे वस्ती शाळेकडे ग्रामपंचायतचे दुर्लक्ष झाले असून शाळा विविध सुविधांपासून वंचित झाली आहे.मुलांच्या सर्वांगीण विकासावर व प्रगतीवर यामुळे परिणाम होत असून ग्रामपंचायतने या शाळेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. दिवसेंदिवस शासकीय शाळांची पटसंख्या घटत असून काही शासकीय शाळा बंद होत आहेत. ही शासकीय शैक्षणिक व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा असून ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी शाळेच्या विकासासाठी निधी खर्च करणे गरजेचे आहे.



या दाभाडे वस्ती शाळेसाठी संबंधित शिक्षकांनी ग्रामपंचायतकडे विविध कामांसाठी वारंवार प्रस्ताव दाखल करून देखील ग्रामपंचायत लक्ष देत नसल्याने ग्रामपंचायतच्या दुर्लक्षा बाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या दाभाडे वस्ती शाळेच्या प्रांगणाला पूर्ण संरक्षण भिंत झाली नसून आसपासच्या रहिवासी लोकांचा अतिक्रमणचा धोका होण्याची शक्यता बळावत आहे. त्याचप्रमाणे शाळेसाठी मुलांना खेळणी साहित्याची मागणी करूनही मिळत नाही तसेच विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर प्युरिफायरची सुविधा नसल्याने पिण्या योग्य स्वच्छ पाण्याची उणीव भासत आहे.तसेच शाळेला संगणकाची आवश्यकता असून विविध भौतिक सुविधांची कमतरता या शाळेत भासत आहे. तरी ग्रामपंचायतने दाभाडे वस्ती शाळेच्या विकासासाठी मागणीप्रमाणे प्रस्ताव मंजूर करून येथील शाळेचा कायापालट करावा,व येथील शाळेचा दर्जा सुधारावा अशी शाळेच्या सुज्ञ पालकांनी मागणी केली आहे.

# पंढरपूरला निघालेल्या दिंड्यांना देवळाली प्रवरा भाजप नगरसेवकांच्या सदिच्छा भेटी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या विविध पायी दिंडी सोहळ्यांना देवळाली प्रवरा नगरपरिषदेतील भाजपचे नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी टेंभुर्णी परिसरात सदिच्छा भेटी देत वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी वारकरी संप्रदायाच्या कार्याला शुभेच्छा देत त्यांच्या सुखरूप वारीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.



प्रारंभी राजयोगी स्वामी त्रिंबकराज महाराज पायी दिंडीस भेट दिली. यावेळी दिंडीचे समन्वयक सचिन ढुस, ह.भ.प. नामदेव महाराज शास्त्री, ह.भ.प. बाबा महाराज मोरे, किशोर महाराज निर्मळ, सोमनाथ महाराज माने, भगवान महाराज मोरे देहूकर, मंजाबापू वरखडे यांची पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली तसेच वारकऱ्यांशी हितगुज साधले.

त्यानंतर राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथील श्री संत कवी महिपती महाराज दिंडीस भेट देण्यात आली. यावेळी मठाधिपती ह.भ.प. अर्जुन महाराज तनपुरे, संत महिपती महाराज देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र साबळे, डॉ.तनपुरे कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर कोळसे, राजेंद्र चव्हाण तसेच कांता कदम यांची भेट घेऊन दिंडीस शुभेच्छा देण्यात आल्या.

याशिवाय राहुरी तालुक्यातील विविध दिंड्यांनाही भेटी देण्यात आल्या.

यावेळी भाजप गटनेते तथा नगरसेवक प्रकाश संसारे, नगरसेवक अजित चव्हाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## जानकीबाई विद्यालयात उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांना अभिवादन



**शिरसगाव** : खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित जानकीबाई वामनराव आदिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खानापूर या विद्यालयात आज महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले सदरप्रसंगी प्राचार्य बाबासाहेब गवारे , साळवे ससाने गावित पाठक गायके प्राध्यापक खपके माने सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## नेवासे फाटा येथे ४० फूट खोल हौदात पडलेल्या श्वानाला जीवदान



**हंडीनिमगाव** : नेवासे फाटा येथील पटारे कॉम्प्लेक्स परिसरातील सुमारे ४० फूट खोल हौदात अनेक दिवसांपासून जखमी अवस्थेत अडकलेल्या भटक्या श्वानाची प्राणीमित्रांनी धाडसी बचावमोहीम राबवून सुखरूप सुटका केली. माहिती मिळताच सचिन नागपुरे यांच्यासह किरण डाके, सलमान शेख, कैलास धारदार आणि दिनेश सरगये यांनी घटनास्थळी धाव घेतली. दोरी व उपलब्ध साधनांच्या साहाय्याने सुमारे अर्धा तास प्रयत्न करून श्वानाला बाहेर काढण्यात आले. उपासमार व जखमांमुळे त्याचा जीव धोक्यात आला होता. प्राणीमित्रांच्या तत्परतेमुळे श्वानाला जीवदान मिळाले असून, त्यांच्या संवेदनशील व धाडसी कार्याचे नागरिकांनी कौतुक केले.

# भोजापूर धरण तुडुंब भरले, डाव्या कालव्यातून पुरचारीला पाणी

## संगमनेर व सिन्नर तालुक्यातील बंधाऱ्यांना होणार पाणीपुरवठा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : भोजापूर धरण पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे धरणात सातत्याने पाण्याची आवक सुरू त्यामुळे ३६१ दशलक्ष घनफूट इतकी क्षमता असलेले भोजापुरचे धरण गुरुवारी पूर्ण क्षमतेने भरले असून ते ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे या ओव्हरफ्लोचे पाणी डाव्या कालव्या तून संगमनेर तालुक्यातील भोजापुर पूरचारीला सोडले आहे. या पाण्याने चारीवर अवलंबून असणार्या गावा तील बंधारे भरले जाणार आहे त्या मुळे परिसरातील शेतकरी समाधानी झाला आहे. सिन्नर तालुक्यात म्हाळुंगी नदीवर ३६१ दशलक्ष घनफूट क्षमतेचे भोजापुर धरण आहे या धरणातील पाण्यावर संगमनेर व सिन्नर या दोन तालुक्यातील काहीगावातील शेतकरी अवलंबून आहे.

या धरणाच्या ओव्हर फ्लोचे पाणी बंधाऱ्यांना सोडण्याचे नियोजन नाशिक जलसंपदा विभाग यांनी केले आहे . या आवर्तनामुळे कालव्या लगतच्या बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा वाढण्यास मदत होणार असून भूजल पातळी उंचावण्यासही हातभार लागणार आहे. तसेच परिसरातील विहिरी व बोअरवेलच्या



पाणीसाठ्यात वाढ होऊन शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे. जलसंपदा विभागाने लाभार्थी शेतकरी, ग्रामपंचायती तसेच संबंधित यंत्रणांनी कालव्याजवळ आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे.

कालव्यात पाण्याचा प्रवाह वाढणार असल्याने नागरिकांनी कालव्याच्या परिसरात अनावश्यक वावर टाळावा तसेच जनावरे आणि लहान मुलांना कालव्याजवळ जाण्या पासून रोखावे, असेही जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले आहे. भोजापूर धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने संगमनेर आणि सिन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून आगामी काळात सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढणार असल्याने खरीप पिकांना मोठा आधार मिळणार आहे. जलसंपदा विभागाकडून आवर्तनाचे नियोजन बद्ध व्यवस्थापन करण्यात येणार असल्याची माहिती नाशिकजलसंपदा विभागाचे जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता सुभाष पगारे यांनी दिली.

> भोजापुर धरण ओव्हरफ्लो झाले आहें पण नियोजन करत असल्याने हे शक्य झाले आहे. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्याकडे आमदार अमोल खताळ पा.यांनी सतत केलेल्या पाठपुराव्या मुळे भजापूर चारीला आवर्तन सोडणे शक्य झाले आहे.या आवर्तना तून संगमनेर तालुक्यातील पळसखेडे ,निमोण,पारेगाव,सोनेवाडी सोनोशी, नान्नज दुमाला या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.
>
> **भीमराज चत्तर, भाजप जेष्ठ नेते व माजी सरपंच, नान्नज दुमाला**

## मुख्याध्यापिका डॉ. सुनिता पारे यांना जिल्हास्तरीय 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळ संलग्न अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रदान करण्यात आलेला प्रतिष्ठेचा जिल्हास्तरीय 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार सोमैया विद्यामंदिर, साकरवाडीच्या मुख्याध्यापिका डॉ. सुनिता पारे यांना प्रदान करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत अहिल्यानगर येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच गणित अध्यापक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्याध्यापिका म्हणून विद्यार्थीकेंद्री शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, नावीन्यपूर्ण उपक्रम, शिक्षक-पालक समन्वय, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्यामुळे डॉ. पारे यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली सोमैया विद्यामंदिरने शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि सहशालेय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय प्रगती साधत परिसरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर सोमैया, सचिव सुहास गोडगे, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांनी डॉ. पारे यांचे अभिनंदन केले. या पुरस्कारामुळे सोमैया विद्यामंदिरच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याला जिल्हास्तरावर गौरव मिळाला असून शिक्षण क्षेत्रात हा सन्मान प्रेरणादायी ठरत आहे.

# राहुरी शहरांचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करा

## आ. कर्डिलेंच्या मुख्याधिकाऱ्यांना सुचना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहरांचा पाणीपुरवठा गेली दोन तीन महीन्यापासून विस्कळीत झाला आहे दुषीत व गाळ मिस्त्री पाण्यानें नागरिक हैराण झाले आहेत धरणांची पाणी पातळी खाली गेल्याने दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो तसेच शहरातील विविध समस्या बाबतीत राहुरी नगर पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अक्षय कर्डिले यांचे या प्रश्नावर लक्ष वेधलें होतें आ कर्डिले यांनी राहुरीच्या मुख्याधिकारी यांच्या शी चर्चा करुन शहरांचा पाणीपुरवठा नियमित करण्याच्या सुचना करून शहरातील विविध समस्यांचा आढावा घेतला असल्याची माहिती माजी विरोधी पक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी दिली.

राहुरी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुळा धरणावरील जॅकवेलचे काम तसेच पाण्याची पातळी खाली गेल्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते त्यावेळी शहराला दोन ते तीन महीने गाळ मिस्त्री पाणी पुरवठा होत होता पालिकेच्या चुकीच्या नियोजनामुळे शहराला दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची प्रथमच वेळ आली होती प्रशासाच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते वारंवार तक्रार करूनही पाणीपुरवठा सुरळीत होत नव्हता शहरात चालू असलेले भूमिगत गटार योजना तसेच नवीन गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू असल्याचे ठिकठिकाणी पाण्याची पाइपलाइन फुटल्याने शहराच्या काही भागात आजही दुषीत पाणी पुरवठा होत आहे. साफसफाई करणारे कर्मचारी झाडलेला कचरा न उचलता भिंतीच्या कडेला लावत असल्याने काही भागात मोठी दुर्गंधी पसरली आहे.

डास प्रतिबंधक औषधांची फवारणी होतं नसल्याने नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. या सारख्या विविध समस्यांच्या बाबतीत सोनवणे यांनी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे व आ अक्षय कर्डिले यांचे लक्ष वेधले होते. शहरात झालेल्या एक शासकीय कार्यक्रमात आ कर्डिले यांनी राहुरी नगर पालिकेचे मुख्याधिकारी व संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांना बोलावून शहरांचा पाणीपुरवठा दररोज व नियमित करण्याचें सुचना केल्या तसेच शहरातील स्वच्छता व नागरिकांच्या आरोग्याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती दादा पाटील सोनवणे यांनी दिली.

# गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या मध्यस्तीने मांडवे खुर्दचे उपोषण तात्पुरते स्थगित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**साकुर** : पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी बुधवार दिनांक १५ जुलै रोजी सकाळी १० वाजता सुरू झालेले ग्रामस्थांचे आमरण उपोषण अखेर पारनेर गटशिक्षण अधिकारी तेजस्विनी पवार यांच्या मध्यस्तीने सायंकाळी ५:३० वा.तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. शाळेला कायमस्वरूपी पदवीधर शिक्षक आणि मुख्याध्यापक मिळावेत या मागणीसाठी पालक आणि ग्रामस्थ आक्रमक झाले होते. सध्या कायम शिक्षक नसल्याने अध्यापनावर आणि नेतृत्व नसल्याने प्रशासकीय कामांवर परिणाम होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती.

उपोषणाची माहिती मिळताच गटशिक्षण अधिकारी तेजस्विनी पवार व शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले गुरुजी यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

तसेच नेमणुकीच्या प्रक्रियेसंदर्भात वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, मांडवे खुर्दची ही शाळा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित आहे. स्वच्छता, पटसंख्या आणि निकालात अव्वल असलेल्या या शाळेसाठीच मूलभूत सुविधांसाठी रस्त्यावर उतरावे लागले, यावर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

उपोषणकर्ते शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव, कैलास गागरे, दिपक बत्तीसे, मंगेश गागरे, तसेच सरपंच कमलताई गागरे, जगन्नाथ जाधव, गौतम बागुल, नामदेव गागरे, रेवन्नाथ गागरे, अण्णासाहेब क्षिरसागर, सोपान आहेर, शिवचरण जाधव, विलास गागरे, नवनाथ गागरे, योगेश आहेर, भागवत बिडकर, अजय बागुल, अनिल गागरे, मंगल बिडकर, नर्मदा भोर आदी उपस्थित होते. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यास आंदोलन पुन्हा तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# २०१७ च्या थकबाकीदारांनाही कर्जमाफीचा लाभ मिळणार

## खंडपिठाचा आदेश; ॲड. काळे यांची माहिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : महाराष्ट्र सरकारने २०१७ साली जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेनुसार शेतकऱ्यांना एक लाख ५० हजार रुपये कर्ज माफ होणार होते. परंतु ज्या शेतकऱ्याकडे यापेक्षा जास्तीचे कर्ज होते ते भरावे असे बँकांनी परिपत्रक काढले होते. त्यामुळे काहींना या लाभापासून वंचित राहावे लागले होते. यासंदर्भात नेवासा तालुक्यातील खेडले परमानंद विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे कर्जदार जालिंदर गोरक्षनाथ तुवर यांना लाभ न मिळाल्याने व ग्रीन यादीत नाव न आल्याने वेळोवेळी डी. डी.आर. व ए.आर. यांच्या कार्यालयासमोर उपोषणे करुनही दखल न घेतल्याने ॲड. अजित काळे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याबाबत उच्च न्यायालयाचे न्या. नितीन सूर्यवंशी व न्या. आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठासमोर या रिट पिटीशन नंबर १२८०९/ २०२२ ची सुनावणी होवून कर्जदाराच्या बाजुने दखल घेत निर्णय दिला. ॲड. अजित काळे यांनी पक्षकाराची बाजू मांडताना सांगितले की, कर्जदाराने एक लाख ५० हजार वरचे पैसे भरले नाही. म्हणून सोसायटीने त्यांना लाभ दिला नाही.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ यामध्ये कोणत्याही प्रकारची अट घातलेली नसताना बँकेने परिपत्रक काढून ओ.टी.एस. योजना आणली आणि त्या माध्यमातून उरलेले पैसे भरण्याचं निर्देश दिले. या सर्व मुद्यांचा विचार करून उच्च न्यायालयाने संबंधित शेतकऱ्याला दोन आठवड्यात पैसे भरण्याची मुदत व चार आठवड्याच्या आत सदर शेतकऱ्याला लाभ देण्याचे आदेश पारित केला आहे. या निकालामुळे राज्यातील जे शेतकरी दीड लाखाच्या वरचे थकीत होते त्या सर्वांना या योजनेचा लाभ दिला जाऊ शकतो असे ॲड. अजित काळे यांनी सांगितले. या निकालाचे शेतकरी संघटनेचे प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, राष्ट्रवादी किसान सभा उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, हरीआप्पा तुवर, साहेबराव चोरमल, मेजर अशोक काळे, ॲड. बाळासाहेब कावळे, बाबासाहेब नाबदे, किरण लंघे, दत्तात्रय निकम, रोहित कुलकर्णी, भाऊसाहेब गव्हाणे, खंडेराव सरोदे, वसंतराव शेरकर, सचिन वेताळ, बंडू चौगुले, बापूसाहेब शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

# मातोश्रींसमवेत दिंडीत रमले आ. अमोल खताळ



> वारकरी संप्रदायाने शेकडो वर्षांपासून भक्ती, सेवा, समता, शिस्त आणि सामाजिक ऐक्याची महान परंपरा जपली आहे. मागील वर्षाप्रमाणे यंदाही वारकरी बांधवांच्या सहवासात पायी वारी करण्याचे आणि विठुरायाच्या दर्शनाचे भाग्य लाभले, हे माझ्यासाठी मोठे सौभाग्य आहे. वारकरी संप्रदायाचा आशीर्वाद आणि जनतेचे प्रेम यांच्यामुळेच मला लोकसेवेची संधी मिळाली. महाराष्ट्रातील संतपरंपरा आणि वारकरी चळवळीचा हा अखंड दीप असाच तेवत राहो, हीच विठ्ठल चरणी प्रार्थना.
>
> **अमोल खताळ, आमदार**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : आषाढी वारीनिमित्त श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या संगमनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र माणकेश्वर आणि श्रीक्षेत्र बाळेश्वर पायी दिंडीसोहळ्यात आमदार अमोल खताळ यांनी आपल्या मातोश्रींसमवेत सहभाग नोंदविला. पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथे त्यांनी गळ्यात टाळ, हातात वीणा घेऊन हरिनामाच्या अखंड गजरात वारकऱ्यांसोबत काही किलोमीटर पायी चालत विठ्ठलभक्तीचा आनंद अनुभवला.

आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो वारकरी दिंड्यांसह पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. त्यामध्ये संगमनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र माणकेश्वर व श्रीक्षेत्र बाळेश्वर या दिंड्यांचाही उत्साहपूर्ण सहभाग आहे. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करत विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांमध्ये भक्तिभाव, समर्पण आणि उत्साह ओसंडून वाहत होता. यावेळी आमदार खताळ यांनी दिंडीत सहभागी झालेल्या ज्येष्ठ वारकरी बांधवांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला.

गेल्या २७ वर्षांपासून अखंड पायी वारी करणाऱ्या आपल्या मातोश्रींसमवेत दरवर्षीप्रमाणे यंदाही काही अंतर पायी चालण्याचा योग साधला. हरिनामाच्या गजरात सहभागी होत त्यांनी वारकरी परंपरेतील समता, सेवा आणि भक्तीभावाचा अनुभव घेतला.

## वडाळा महादेवच्या रेणुका आश्रमात ४९ वा गुरुपौर्णिमा महोत्सव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्रीक्षेत्र रेणुका देवी आश्रमात २९ जुलै (बुधवार) रोजी ४९ वा गुरुपौर्णिमा महोत्सव विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. आश्रमाचे संस्थापक मौनयोगी सद्गुरू रेवणनाथ महाराज यांच्या प्रेरणेने हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून, ही माहिती आश्रमाच्या मुख्य विश्वस्त मातोश्री नलिनी देवी यांनी दिली.

सकाळी ६ वाजता रेणुका मातेचा अभिषेक व महापूजा, ७ वाजता गुरूमंत्र अनुष्ठान व नामजप हवन, ८ वाजता ध्वजपूजन, ध्वजारोहण व मंदिर प्रदक्षिणा, तर ९ वाजता सद्गुरू ओंकारनाथ महाराज व सद्गुरू रेवणनाथ महाराज यांच्या पादुका व समाधीचे पूजन होईल. सकाळी १० वाजता साहेबराव हांडे व सहकारी यांचा 'भाव मधुर भजनांजली' कार्यक्रम रंगणार आहे. दुपारी १२ वाजता प्रा. आदिनाथ महाराज जोशी वडाळकर यांचे 'वंदे श्री गुरु परंपरा' या विषयावर प्रवचन होईल. त्यानंतर महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, प्रकाश सारंगधर राऊत परिवारातर्फे महाप्रसादाचे वितरण होणार आहे. महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


## राहाता नगरपरिषद, राहाता ता. राहाता, जि. अहिल्यानगर

दिनांक : २३/०७/२०२६ जा.क्र.पा.पु.११/१७१/२०२६

### जाहिर निविदा सूचना

सर्व पुरवठादार / मक्तेदार यांना कळविण्यात येते की, राहाता नगरपरिषद हद्दीत विविध कामाकरिता निविदा प्रसिद्ध करणेत येत आहे. तरी संबंधित कामाकरीता इच्छुक पुरवठादार / मक्तेदार यांचेकडून दिनांकः २४/०७/२०२६ पासून ते दिनांकः ०४/०८/२०२६ पर्यंत बंद २ लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. विहित नमुन्यातील निविदा फॉर्म पाणी पुरवठा विभागात मिळतील. सिलबंद पाकिटात निविदा दिनांकः ०४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा पर्यंत नगरपरिषद कार्यालयात पोहोच करणेत यावे.

सदर निविदाचो तपशिल पुढील प्रमाणे

**वैभव लोंढे**
**मुख्यकधिकारी (गट-अ)**
**राहाता नगरपरिषद, जि.अहिल्यानगर**


# जिल्हा परिषद शाळेच्या वतीने काढण्यात आलेल्या बालदिंडीचे स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : येथील नेवासा खुर्द मुले जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आषाढी एकादशी उत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांची संत श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरापर्यंत पायी बालदिंडी काढण्यात आली.या दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

बालकांनी केलेली विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम महाराज यांची केलेली वेशभूषा सर्वांची आकर्षण ठरली होती. नेवासा खुर्द जिल्हा परिषद शाळा प्रांगणातून दिंडीस प्रारंभ करण्यात आला.पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम,...पंढरीनाथ भगवान की जय असा जयघोष यावेळी करण्यात आला.





मुख्याध्यापक असिफ शेख,शिक्षक आण्णासाहेब शिंदे,शिक्षिका सुनिता कर्जुले-राऊत ,कामिनी बायस,संध्या लोंढे ,विद्या खामकर, ज्योती गाडेकर,मिनाक्षी लोळगे,अर्चना बोकारे, अश्विनी मोरे, प्रतिभा गाडेकर यांनी या दिंडीचे नेतृत्व केले.

सदर दिंडीचे आगमन संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात झाल्यानंतर शिक्षणप्रेमी बालेंद्र पोतदार,अनिल ताके,शालेय व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष प्राजक्ता कडू, सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण,अँड.दीपक गायकवाड, स्वप्नील मगर यांनी दिंडीचे स्वागत केले.

यावेळी दिंडीतील बालवारकऱ्यांनी ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या गजरात रिंगण सादर करत पावली खेळली. यावेळी उपस्थित बालवारकऱ्यांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पैस खांबाचे दर्शन घेतले.जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे यांच्या हस्ते दिंडीचे नेतृत्व करणाऱ्या शिक्षकांचा श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला.

उपस्थित बालवारकऱ्यांना जिल्हा परिषद शाळेच्या वतीने केळी व राजगिरा लाडूंचे वाटप करण्यात आले.संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाने दिंडीची सांगता करण्यात आली.


### जाहीर समन्स

प्रो फी जमा रु
प्रो पान न
नेता - ३१.८.२०२६
नी-४२
रे सी अ नंबर /२०२४

एस.एस.चौधरी
ॲडव्होकेट श्रीरामपूर

श्रीरामपूर येथील मे जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात

श्री.दीपक लक्ष्मण डावखर वगैरे - अपेलंट
विरुद्ध
सौ.वैशाली शिवराम साठे वगैरे - रेस्पाडेंट
प्रति
रेस्पाडेंट नंबर ३ श्रीमती मीना प्रभाकर खर्डे, रा.आश्वी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर
यांसी

आपणास या जाहीर समन्स/नोटिस द्वारे कळविण्यात येते की प्रस्तुतचे अपील हे तुम्हा विरुद्ध व इतर रेस्पाडेंट यांचे विरुद्ध श्रीरामपूर येथील मे सिव्हील जज साहेब सीडी यांनी नंबर ३७/२०१५ मधील दिनांक १८/१०/२०२३ रोजी पारित केलेले जजमेंट व डिक्रीविरुद्ध दाखल केलेले आहे.

सदर अपिलात तुमचे विरुद्ध वेळोवेळी समन्स/नोटीस बजावणी बाबत आदेश होवूनही अद्याप बजावणी झालेली नाही. सदर प्रकरणात पुढील तारीख ही दिनांक ३१/८/२०२६ ही नेमण्यात आलेली आहे.

वर नमूद तारखेच्या दिवशी तुम्ही सकाळी १०.३० वा. या मे कोर्टात स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी हजर रहावे.

तुम्ही वर नमूद नेमलेले तारखेस व वेळी मे कोर्टात हजर न राहिलेस तुमचे विरुद्ध पुढील आदेश पारित केला जाईल.

आज रोजी माझ्या सैनिशी व मे कोर्टाची शिक्क्यानिशी दिली असे.

**कामगिरी क्लर्क** — **जिल्हा न्यायालय, श्रीरामपूर**
**अधीक्षक** — **जिल्हा न्यायालय, श्रीरामपूर**

शिक्का



निशाणी नं. ०६
नेमलेली ता.०३.०९.२०२६

ॲड. आर.डी. घावटे

### जाहीर नोटीस

नेवासा येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब व. स्तर यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ९८/२०२६

**अर्जदार**
१. पांडुरंग रंगनाथ आदमने वय ३८, धंदा शेती
२. शरद रंगनाथ आदमने वय ४२, धंदा शेती दोघेही रा. निपाणी निमगांव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**
कोणी नाही - **मयत**
लवंगाबाई रंगनाथ आदमने-दि. १९.११.२०२६

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं. ९८/२०२६ दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ व २ यांची मयत लवंगाबाई ही सख्खी बहिण आहे. मयत लवंगाबाई रंगनाथ आदमने यांची आई व वडिल हे पुर्वीच मयत झालेले आहे. लवंगाबाई रंगनाथ आदमने ह्या दि. १९.११.२०२५ रोजी मौजे निपाणी निमगांव माळीचिंचोरे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे मयत झालेल्या आहे. मयताचा संपुर्ण विधी हा अर्जदार यांनी केलेला आहे. मयत लवंगाबाई रंगनाथ आदमने ही अर्जदार व त्यांचे आई वडिल त्यांच्या मध्ये राहत होती. विमा पॉलिसी घेते वेळेस लवंगाबाई हिने तिचे वारस म्हणुन तिची आई नामे गयाबाई रंगनाथ आदमने यांना नाव दिले होते. परंतु गयाबाई मयत झाल्यामुळे गयाबाई हिचे देखिल कायदेशिर वारस अर्जदार हेच आहे. मयत लवंगाबाई रंगनाथ आदमने यांना अर्जदार नं. १ व २ हेच वारस आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयत लवंगाबाई रंगनाथ आदमने यांना ईतर कोणीही वारस नव्हते व नाही. त्यांची पालन पोषणाची जबाबदारी ही अर्जदार यांचेवरच होती. मयत लवंगाबाई रंगनाथ आदमने यांनी भारतीय आयुविमा महामंडळाची दोन विमा पॉलिस घेतल्या होत्या. विमा पॉलीसी नं. ९५८४९८९७२ रक्कम रुपये १,५०,०००/- व विमा पॉलीसी नं. ९५८४९८९७१ ही रक्कम रुपये १,००,०००/- भारतीय आयुर्वीमा महामंडळाची शाखा शेवगांव मध्ये काढलेल्या होत्या. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र शाखा नेवासा येथील खाते नं. ६०२४९४८४६७२ या मध्ये र.रु. २३,२८५.५७ अशी आहे. सदर रकमेस अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्याच्या आत किंवा दि.०३.०९.२०२६ पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवून हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजुन मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयताचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि.२२.०७.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे. पुढील नेमलेली तारीख - ०३.०९.२०२६

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधीक्षक दिवाणी**
**न्यायालय क. स्तर नेवासा**

# पान १ वरुन

## वैद्यकीय प्रवेशात जागा अडवणाऱ्यांना सरकारचे 'इंजक्शन'!

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) यापूर्वीच देशातील वैद्यकीय प्रवेश पूर्णपणे केंद्रीकृत पद्धतीने करण्याचे निर्देश दिले असतानाही महाराष्ट्रात संस्थात्मक फेरी कायम राहिल्याने अनेकदा वाद निर्माण झाले होते. काही महाविद्यालयांकडून गुणवत्ता यादीऐवजी आर्थिक क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिल्याचे आरोपही वारंवार झाले.सरकारच्या नव्या निर्णयामुळे प्रवेश प्रक्रियेत शिस्त, समान संधी आणि पारदर्शकता वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, केवळ कठोर नियम करून उपयोग होणार नाही; त्यांची काटेकोर अंमलबजावणी आणि संस्थात्मक कोट्यातील व्यवहारांवर प्रभावी देखरेख ठेवली गेली, तरच वैद्यकीय प्रवेश व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास अधिक दृढ होईल.

## आढळा धरण तुडुंब भरले

परंतु सलग दुसऱ्या वर्षी आढळा धरण अगोदर भरले असल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे. तसेच देवठाण वीरगाव, हिवरगाव आंबरे, डोंगरगाव, पिंपळगाव निपाणी व गणोरे ,तसेच अकोले तालुक्यातील कोथळे, बलठण टिटवी,शिरपुंजे, पाडोशी, सांगवी धरणभरले असून यापूर्वी पिंपळगाव खांड, आंबित, नाकी ही छोटी धरण पाझर तलाव भरलेले आहेत आता आढळा धरण भरले आहेत.

## उपचाराअभावी दोन चिमुकल्यांचा मृत्यू?

डॉ. प्रशांत मुळे यांच्या निलंबनाची मागणी करत तीव्र आंदोलन छेडले. याबाबत समजलेली सविस्तर माहिती अशी की, सकाळी आठच्या सुमारास आनंदी अनिल कांडेकर (वय ३) आणि वीरा प्रवीण कांडेकर (वय ३) या दोन बालिका शेततळ्यात पडल्या. घरातील किसन कांडेकर यांनी ही घटना पाहिल्यानंतर त्यांना तातडीने गावातील डॉ. राहुल पवार यांच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी त्वरित हलविण्याचा सल्ला देण्यात आला.यावेळी लोणी प्राथमिक आरोग्य केंद्रातून म्बुलन्स मागविण्यात आली. मात्र, डॉ. स्नेहल गायकवाड यांनी केंद्राचे प्रभारी डॉ. प्रशांत मुळे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर म्बुलन्स देण्यास नकार देण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. परिणामी, दोन्ही बालिकांना खासगी वाहनाने काष्टी येथे खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात आणत, डॉ. प्रशांत मुळे यांच्यावर निलंबनाची कारवाई होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याची भूमिका घेतली. काही नागरिकांच्या समजुतीनंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, नातेवाईक उपस्थित नसल्याचे कारण देत शवविच्छेदन न झाल्याचा आरोपही करण्यात आला.

## अल्पवयीन मुलाचे लैंगिक शोषण

घटनेची माहिती कळताच शेवगावचे पोलीस उपविभागीय अधिकारी निरज राजगुरू तसेच शनी शिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक धनवटे, पोलीस उपनिरीक्षक गिरीशकुमार केदार, यांनी घटना स्थळी भेट दिली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गिरीशकुमार केदार हे करत आहेत. या घटनेची माहिती कळताच परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

## अवैध वाळू वाहतुकीचे ४ ट्रॅक्टर ट्रॉलीसह पकडले: चौघाविरुद्ध गुन्हा

प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे, पो. ना रविंद्र वाघ, पो. कॉ योगेश दळवी व पो. कॉ. ज्ञानेश्वर बेलेकर यांनी ही कारवाई केली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पिंपरखेड गावच्या शिवारात, पिंपरखेडे ते बावी जाणाऱ्या रस्त्यावर चार ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने घटनास्थळी छापा टाकून चार ट्रॅक्टर ताब्यात घेतले. चौकशीत चालकांनी आपली नावे शाकीर हुसेन शेख , अर्जुन बलभीम लबडे , रामदास नवनाथ कदम व अंगद सर्जेराव कदम ( सर्व. रा. पिंपरखेड, ता. जामखेड जि. अहिल्यानगर) अशा चार जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईत आरोपींकडून १६ लाख २० हजार रुपये किमतीचे चार ट्रॅक्टर-ट्रॉली व त्यामधील ४ ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस कॉ. योगेश दळवी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जामखेड पोलिस स्टेशन ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने चारही आरोपींची सध्या जामिनावर मुक्तता केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास जामखेड पोलिस स्टेशनचे पो. नि. दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स. पो. नि. अजित मोरे हे करत आहेत. जामखेड तालुक्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीवर कायमस्वरूपी आळा घालण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तर दुसरीकडे अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधातील अशा कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पो. नि. दशरथ चौधरी यांनी सांगितले आहे.

## श्रीरामपूरमधील गुन्हेगारीवर पोलिसांची धडक कारवाई

उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या उपस्थितीत पोलिसांपेक्षा कोणीही मोठे नाही असा इशारा देत अपर पोलीस महासंचालकांनी कठोर कारवाईचे स्पष्ट आदेश दिले होते.या उच्चस्तरीय दौऱ्यानंतर, काल शिर्डी येथे एका तरुणीला पिस्तुलाचा धाक दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी सोनू बेग आणि 'राष्ट्रीय श्रीराम सेवा संघाचे' प्रमुख सागर बेग वर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या दंडात्मक कारवाईमुळे सागर बेग यांना अटक होण्याची शक्यता बळावली असून, तसे झाल्यास बेग टोळीला हा अत्यंत मोठा धक्का मानला जात आहे. या कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारीचे कंबरडे मोडण्यास मदत होईल आणि नागरिकांमध्ये सुरक्षेचा विश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.मुख्य आरोपी बाबू साळवे याच्यावर खून, विनयभंग व आर्म अ‍ॅक्टसह तीन गुन्हे दाखल आहेत. तर सोनू बेग हा पोक्सो व आर्म अ‍ॅक्टच्या गुन्ह्यात सध्या पोलिस कोठडीत आहे. शिर्डी पोलिस ठाण्यात दिलेली फिर्याद पुढील तपासासाठी श्रीरामपूर शहर पोलिसांकडे वर्ग करण्यात आली आहे. अतिरिक्त अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपअधीक्षक जयदत्त भवर यांनी ही माहिती दिली.

## पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला; वृद्धाचा मृत्यू, १० जण गंभीर

यांना राहुरी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असून, काहींना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच चिंचोली गावचे सरपंच सुरेश लाटे,वनक्षेत्रपाल सुनील साळुंखे, वनपाल संदीप कोरके, वनपाल बाळासाहेब आटोळे ,वाहन चालक ताराचंद गायकवाड व आपत्ती व्यवस्थापनचे आपदा मित्र अनिल जाधव व ई.आर.टी. रेस्क्यू टीम अहिल्यानगर ,स्थानिक प्रशासन, राहुरी पोलीस,आरोग्य विभाग, पशुवैद्यकीय विभागाचे पथक तसेच ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. पिसाळलेल्या कुत्र्याचा शोध घेण्याचे काम सुरू असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवावर प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ महालगाव कडकडीत बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** दिल्ली येथील जंतर-मंतर परिसरात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला महालगावमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दि. २३ गुरुवारी सकाळपासूनच महालगावातील व्यापारी, व्यावसायिक तसेच विविध आस्थापनांनी स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवून बंदला पाठिंबा दर्शविला. त्यामुळे गावातील प्रमुख बाजारपेठ दिवसभर शांत असून व्यवहार पूर्णपणे ठप्प असल्याचे चित्र पाहायला मिळाले.



बंदच्या पार्श्वभूमीवर गावात शांतता राखण्यात आली असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विरगांव पोलिस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा निषेध नोंदवित संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली. महालगावातील व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी बंदला सहकार्य करून निषेध व्यक्त केला.

# मुळा कारखाना कार्यस्थळी वृक्षारोपण

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** माजी मंत्री शंकरराव गडाख पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंत सामाजिक प्रतिष्ठान, शारदाताई फाउंडेशन आणि मुळा समूह यांच्या संयुक्त विद्यमाने मुळा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. नेवासा पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. सुनिताताई गडाख पाटील आणि युवा नेते उदयनदादा गडाख पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना सुनिताताई गडाख म्हणाल्या, ''वृक्षारोपण ही केवळ आवड नसून काळाची गरज आहे. तंत्रज्ञानामुळे विकास झाला असला तरी त्याचे दुष्परिणाम पर्यावरणावर होत असून हरित क्रांती टिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आवश्यक आहे.''

कार्यक्रमास मुळा कारखान्याचे संचालक बाप्पुतात्या शेटे, भास्कर भुसारी, शिवाशेठ बाफना, हभप आप्पा महाराज निमसे, डॉ. रामनाथ बडे, रणजीत जाधव, डॉ. खोसे, जयराम काळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. तसेच मुळा सहकारी साखर कारखाना, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.




# झाडे लावणे व टिकवणे काळाची गरज: आ. हेमंत ओगले

## श्रीरामपुरात वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येणाऱ्या काळात झाडे लावणे आणि ती टिकवणे ही आजची मुख्य काळाची गरज बनली आहे. नागरिकांनी जागरूक राहून या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार हेमंत ओगले यांनी केले. श्रीरामपूर नगरपरिषदेतर्फे आयोजित वृक्ष लागवडीच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी नगराध्यक्ष करण ससाणे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे या उपक्रमाबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, ''हरित श्रीरामपूर''साठी शहरातील नागरिकांनी पुढाकार घ्यावा, नगरपालिका नागरिकांना यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल. आपले श्रीरामपूर शहर स्वच्छ आणि सुंदर कसे होईल, यासाठी आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करू,ससाणे म्हणाले.



यावेळी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, बाबासाहेब दिघे,ज्ञानेश्वर मुरकुटे,अण्णासाहेब डावखर,प्रमोद भोसले उपनगराध्यक्षा कांचन सानप, सभापती मंजुश्री मुरकुटे, उपसभापती नागेश्वरी एडके, सभापती दीपक वमने, निलोफर शेख, आशा परदेशी, वैशाली पोटे, सोनिया कक्कड योगिता नागले, योगेश जाधव, गोपाल लिंगायत, डॉ. दिलीप शिरसाठ, दत्तात्रय सानप, महमद शेख, डॉ. देशपांडे, डॉ. सोमाणी, रितेश एडके, संतोष परदेशी, बिट्टूशेठ कक्कड, अरुण मंडलिक, संजय गोसावी, सरबतजीत चूग, रितेश चव्हाणके, सागर भागवत आणि अभिजीत लिप्टे, यांच्यासह अनेक नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिर्डीतील १२ चारी भूमिगत करण्यास तीव्र विरोध ; रहिवाशांचे नगर पालिकेस निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शहरातून जाणारी १२ चा प्रश्न पुन्हा एकदा उभा राहण्याची चिन्हे निर्माण झाली असून चारी भूमीगत करू नये या मागणीसाठी पुर्वेकडील शेकडो रहिवाशांनी सहयाची मोहीम राबवत नगर पालिकेस निवेदन दिले आहे . दिलेल्या निवेदनात ते म्हणाले की, चारी नं. १२ दत्तनगर, माऊलीनगर, शिंदे-शेळके वस्ती येथील रहिवासी, शेतकरी व नागरीक असून आपणांस विनम्र निवेदन करीत आहोत की, शिर्डी नगरपरिषद मार्फत ह्या परिसरात चारी नं. १२ मध्ये नळ्या टाकून बंदिस्त करण्यासाठी काहीजण प्रयत्नशील आहेत. चारी बंदीस्त झाल्यास परिसरात नैसर्गिक पाणी झिरपण्याची व्यवस्था पूर्ण पणे नष्ट होईल भूजल पातळी मोठ्या प्रमाणावर घटण्याची शक्यता आहे. चारी नं. १२ परिसर हा शेतीप्रधान भाग असून येथील शेतकरी, रहिवासी व नागरीक विहीर, बोअरवेल व नैसर्गिक पाणीसाठ्यावर पूर्णपणे अवलंबून आहेत. तरी सदर चारी कोणत्याही परिस्थितीत बंदीस्त करू नये अशी मागणी नानासाहेब शिवाजी गोंदकर, गणपत गायके ,अशोक गायके ,चंद्रकांत शिंदे, यशवंत गायके, अनुप गोंदकर, मीनाताई गोंदकर, रावसाहेब शेळके, अशोक गायके, सुरेश शेळके, सोमनाथ शिंदे, तात्या शिंदे, चेतन शिंदे यांच्यासह शेकडो नागरिकांच्या निवेदनावर सह्या आहेत .दरम्यान सदर चारी वरून शिर्डीतील पश्चिमे कडील लोकांनी बंदीस्त चारीच्या विरोधात जन आंदोलन उभारत मोठा वाद निर्माण झाला होता तो वाद मिटविण्यासाठी खुदद डॉ. सुजय विखे यांना मध्यस्थी करत सदर वाद मिटवण्यात येवून काम स्थगीत केले होते आता पुन्हा पूर्वेकडील लोकांनी बंदीस्त विरोधी व काहींनी काम झाले पाहिजे अशी भूमिका घेतल्याने पुन्हा एकदा हा वाद पेटण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

**दोन नगरसेवकांत मतभेद**

सदर चारी प्रभाग क्रमांक २ मधून जाते तेथे अपक्ष म्हणून नंदू उर्फ सतिश गोंदकर तर शिवसेना शिंदे गटाच्या सौ सुनिता वसंत गोंदकर निवडून आलेल्या आहेत . नंदू गोंदकर यांनी कामाचे टेंडर नसल्याने काम होणार नाही अशी भूमिका घेतली आहे तर वसंत गोंदकर यांनी काम झाले पाहिजे यासाठी सह्यांची मोहीम राबविली आहे . दोन्ही गटांनी सहयांची मोहीम राबवल्याने आता पुढे काय संघर्ष होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# मराठी चित्रपटाला नकार, हिंदी चित्रपटाला गाभाऱ्यात परवानगी? राम कातोरे यांचा संतप्त सवाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** येथील श्री साईबाबा मंदिरातील चित्रीकरण परवानगीबाबत दुहेरी निकष लावले जात असल्याचा आरोप करत निमगाव को (ता. राहाता) येथील स्थानिक कलाकार व सिनेअभिनेता रामनाथ कातोरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. रामनाथ कातोरे यांनी सांगितले की, सुमारे सहा महिन्यांपूर्वी ''पालखी'' या मराठी चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्याकडे नियमानुसार लेखी परवानगी मागण्यात आली होती. त्यावेळी संस्थानने दर्शन रांग व मंदिर परिसरात चित्रीकरणास परवानगी दिली; मात्र ''सुरक्षेचे कारण'' सांगत मंदिराच्या गाभाऱ्यात चित्रीकरणास स्पष्ट नकार दिला. मात्र, अलीकडे एका हिंदी चित्रपटाला मंदिराच्या गाभाऱ्यात चित्रीकरणासाठी परवानगी देण्यात आल्याचे समोर आल्याने स्थानिक कलाकारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ''जर सुरक्षेचे कारण मराठी चित्रपटासाठी लागू होते, तर तेच नियम हिंदी चित्रपटासाठी का लागू झाले नाहीत?'' असा सवाल रामनाथ कातोरे यांनी उपस्थित केला आहे. ''पालखी'' या चित्रपटात अभिनेते प्रविण तरडे, सुबोध भावे, यतिन कार्येकर, किशोर कदम यांच्यासह शिर्डी परिसरातील अनेक स्थानिक कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. स्थानिक कलाकारांना रोजगार व संधी मिळावी, तसेच शिर्डी परिसरात चित्रपटसृष्टीला चालना मिळावी यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. मराठी आणि हिंदी चित्रपटांबाबत वेगवेगळे निकष लावले जात असतील, तर हा स्थानिक कलाकारांवर अन्याय का या प्रकरणात श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यात चित्रीकरणास परवानगी देण्यामागे नेमकी कोणती प्रक्रिया राबविण्यात आली, निर्णयाचे निकष काय होते, तसेच या संपूर्ण प्रकरणाला कोणत्याही प्रकारच्या अर्थकारणाचा स्पर्श झाला आहे का, याची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या संदर्भात लवकरच मा.खा. सुजय विखे पाटील यांची भेट घेऊन संपूर्ण प्रकरण त्यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे रामनाथ कातोरे म्हणाले .

# स्मार्ट मिटर सर्दभात विजवितरणची चांदा ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांसोबत बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा आणि परिसरात ग्राहकांची पूर्वपरवानगी न घेता स्मार्ट मिटर बसवले जात असून स्मार्ट मीटर मुळे वाढीव वीज बिल येत असल्याच्या तक्रारीची दखल घेत वीज वितरणने चांदा ग्रामपंचायत कार्यालयात चांदा ग्रामस्थ व गावातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत या सर्दभात बैठक घेतली .

चांदा आणि परिसरात सध्या स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू आहे. मात्र ग्राहकांचा स्मार्ट मीटरला विरोध आहे. यामुळे वाढीव वीज बिल येते. अशी तक्रार ग्रामस्थांची असल्याने आज सकाळी चांदा ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात वीज वितरणचे चांदा कार्यालयाचे मुख्य अभियंता जी. एस. दुसंगे चांदा सबस्टेशनचे सर्व लाईनमन यांच्या समवेत गावातील प्रमुख पदाधिकारी व ग्रामस्थांशी संवाद साधला.याबाबत मुख्य अभियंता जी.एस. दुसंगे म्हणाले की स्मार्ट मीटर केंद्र शासन आणि राज्य शासनाची योजना असून यामुळे कुठलेही वाढीव बिल येत नाही. यासंदर्भात कुठलीही अडचण असल्यास ती तातडीने दूर केली जाईल. मात्र सर्व ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. माजी सभापती कारभारी जावळे यांनी ग्राहकांच्या स्मार्ट मीटर संदर्भात असलेल्या विविध अडचणी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी चांदा गावचे सरपंच रावसाहेब दहातोंडे, मुळाचे माजी संचालक बाबुराव चौधरी, नाथा दहातोंडे, मच्छिंद्र दहातोंडे, मोहन राशिनकर, वीज वितरणचे वडाळा शाखा अभियंता भगत, संतोष गाढवे, राजेंद्र बर्फे, राहुल नागपुरे, अरुण चव्हाण, गणेश मारेकर ,ऋतिक चव्हाण आदींसह चांदा व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्मार्ट मिटर बसू नये असा ठराव चांदा ग्रामसभेत ठराव झालेला असतानाही स्मार्ट मीटर बसवण्यात येत असल्याच्या ग्राहकांची तक्रार आहे. त्यामुळे जोपर्यंत चांदा ग्रामस्थांची स्मार्टमीटर बसवण्यास संमती मिळत नाही. तोपर्यंत स्मार्ट मीटर चाद्यात बसू नयेत. तसेच विज वितरणकडे चांदा ग्रामपंचायतीची मोठी जागभाडे थकबाकी असून ती तातडीने मिळावी.

**रावसाहेब दहातोंडे**
**सरपंच चांदा**

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME FARZANA MOHAMMADHUSSAIN SHAIKH (NAME ASPER OLD PASSPORT NO.K1787190) TO NEW NAME AS FARZANA MOHAMMAD HUSAIN SHAIKH VIDE AADHAR NO.2375 8833 0421

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME KAMRUNNISA KHALIL SHAIKH (NAME AS PER OLD PASSPORT NO.J9771859) TO NEW NAME AS KAMRUNNISA KHALEEL SHAIKH VIDE AADHAR NO.3378 7204 7740

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ कोल्हारमध्ये आक्रोश सभा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ कोल्हार भगवतीपुर येथील स्व. माधवराव खर्डे पाटील चौकात आक्रोश व निषेध सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. सभेत बोलताना त्यांनी निवडणुकीपूर्वी करण्यात आलेल्या विविध आश्वासनांची पूर्तता न झाल्याचा आरोप करत केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका केली. तसेच विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस कारवाईचा निषेध व्यक्त करून या घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. निषेध सभेपूर्वी प्रवीण लोखंडे यांनी संविधानाचे वाचन केले. यावेळी अनिल खर्डे पाटील, डॉ. सुनील खर्डे पाटील, तुषार बोऱ्हाडे, सुरेश पानसरे, शिवकुमार जंगम, बाळासाहेब खर्डे, लवलेश लोखंडे, नानासाहेब लोखंडे, वृषाली लोखंडे, पत्रकार प्रमोद कुंभकर्ण यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेनंतर लोणी पोलीस ठाण्याचे प्रतिनिधी सांगळे यांच्यामार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि .२४ जुलैं २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१३९ ४९० ६७० | ३-१ | १४६ २९० ४७० | जोड ३९-७१-२५-६८-१०

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१२४ ४६७ १३३ | ७-५ | १४० १५९ ११३ | जोड ७९-३५-८१-२४-५०

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१५८ ३५७ ११३ | ५-३ | १२० ६७० ५८० | जोड ५७-८३-६२-९०-३४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

# द • ख • ल

## बोल्हेगावात स्वामी समर्थ केंद्रात रविवारी पारायण

**अहिल्यानगर :** बोल्हेगाव फाटा परिसरातील संत तुकाराम नगर येथील स्वामी समर्थ केंद्रात रविवारी सकाळी ८ ते ११ या वेळेत २५ हजार भाविकांचा सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. केंद्रांचे प्रमुख चंद्रशेखर काका



लोळगे यांच्या पुढाकारातून हा अभिनव उपक्रम साकारणार आहे. तब्बल २५ वर्षांपूर्वी हे केंद्र सुरु झाले. प्रारंभी परिसरातील विरळ वस्तीमुळे भाविकांची संख्या मर्यादित होती. पण हळूहळू या केंद्रात भाविकांचा ओघ वाढू लागला. व्यसनाधीनतेच्या आहारी जाण्याच्या तसेच नैराश्येच्या मार्गांवर असलेल्या तरुण पिढीला स्वामींचे विचार भावले. या केंद्रात सेवा देणा-यांची संख्या वाढू लागली. जवळ कमी पैसे असतानाही व्यसनांचा मार्ग न अवलंबविता अनेक तरुणांनी अध्यात्मात झोकून देत उद्योग-व्यवसाय व नोकरी मिळविण्यात यश मिळविले. केंद्रातील बाल संस्कार विभागासह सर्व १८ विभागांच्या माध्यमातून सर्वंकष समाज घडविण्याचे काम खूप चांगल्या पद्धतीने झाले. त्यामुळेच सध्या या केंद्रात मोठ्या प्रमाणात सर्व स्तरातील भाविकांची मोठी वर्दळ असते. आता बोल्हेगाव परिसरातील नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी बोल्हेगाव स्वामी समर्थ सेवा केंद्रात परिसरातील भक्तगणांसह जिल्ह्यातून व परजिल्हयातूनही भाविक मंडळी केंद्रात आवर्जून हजेरी लावतात. विशेषत: गुरुवार व रविवार या दिवशीची गर्दी उच्चांकी असते. रविवारी बोल्हेगाव फाटा येथील स्वामी समर्थ केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळ्यात आबाल-वृद्धांसह सर्व वयोगटातील भाविकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन चंद्रशेखर काका लोळगे यांनी केले आहे.

## शहरात जिल्हास्तरीय 'नशा मुक्त भारत' या विषयावर विविध स्पर्धा

**अहिल्यानगर :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत अहिल्यानगर व सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात 'युवा शक्ती, नशा मुक्त भारताची शक्ती' या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, सर्जनशीलतेला चालना देणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना दृढ करणे हा असून, या स्पर्धेत युवक-युवतींना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २९ जुलै रोजी शहरातील सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) महाविद्यालय येथे होणार आहे. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील सर्व युवक-युवती या स्पर्धांमध्ये वैयक्तिक अथवा गट स्वरूपात सहभागी होता येणार आहे. स्पर्धांमध्ये लोकगीत (संगीत), नृत्य, नुक्कड नाटक/माईम, चित्रकला, वादविवाद, लघुपट/रील, घोषवाक्य लेखन तसेच कविता/स्लॅम पोएट्री अशा विविध कला व साहित्य प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व स्पर्धांचा विषय 'नशा मुक्त भारत' हा असून युवकांनी व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश आपल्या कलाकृतीतून मांडायचा आहे.

## दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा निषेध पीपल्स रिपब्लिकनतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अहिल्यानगर :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्ज व अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केल्याच्या घटनेचा निषेध करत पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात संबंधित घटनेची सखोल व निष्पक्ष कायदेशीर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नीट, विविध शासकीय भरती परीक्षा आणि शिक्षक पात्रता परीक्षा यांसह विविध स्पर्धा परीक्षांचे वारंवार पेपरफुटीचे प्रकार समोर येत असल्याने त्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या अनियमिततेची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी सुमेध गायकवाड, किरण गायकवाड, गौतम म्हस्के, गौतमी भिंगारदिवे, सुरेश भिंगारदिवे, सागर ठोकळ, मंगल पालवे, प्रशांत भिंगारदिवे, अनिकेत विधाते, लता बर्डे, लतिका पाटोळे, कविता भिंगारदिवे, राधा पाटोळे, सुनीता धनवटे, सुमन काळापहाड, नयन खंदारे, किरण शिंदे, जयश्री गायकवाड, सिद्धांत गायकवाड, सारिका गांगुर्डे, माया जाधव, ज्योती साठे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### दडपशाही नव्हे, संवाद हवा

# अण्णा हजारेंचे वाडीया पार्कमध्ये मौन आंदोलन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** दिल्लीमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी गुरुवारी नगर शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलाच्या आवारात असलेल्या महात्मा गांधी पुतळ्याजवळ मौन धरणे आंदोलन केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व तरुण उपस्थित होते. यावेळी त्यांनी तिरंगा ध्वज उंचावत आंदोलनात सहभाग घेतला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे सहा वर्षानंतर मौन आंदोलन केले आहे. यापूर्वी सन २०१९ मध्ये त्यांनी शेतकर्यांच्या प्रश्नावर राळेगणसिद्धी येथे मौन आंदोलन केले होते. काही दिवसांपूर्वी माहिती अधिकार कायद्याच्या नियमावलीमध्ये राज्य सरकारने जाचक बदल केले याकडे लक्ष वेधत त्या नियमावली मागे घ्याव्यात या मागणीसाठी उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र त्यांचे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच, दोन दिवस आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निमावलीला स्थगिती दिल्याने हजारे यांनी आंदोलन स्थगित केले होते. गुरुवारी साडेबाराच्या सुमारास अण्णा हजारे यांचे राळेगणसिद्धी येथून नगरला आगमन झाले. भारतमातेचे पूजन करून त्यांनी मौन व्रत स्वीकारले. अनामप्रेम संस्थेच्या अंध विद्यार्थ्यांनी यावेळी देशभक्तीपर गीत गायन केले. अण्णा हजारे यांच्या चळवळीतील कार्यकर्ते ॲड. श्याम आसावा, ॲड. कारभारी गवळी, दीपक पापडेजा, संदीप कुसळकर, सुधीर भद्रे आदींनी आंदोलनाची पार्श्वभूमी विषद केली. दरम्यान राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सुभाष तळेकर, अशोक मासाळ, विलास पेद्राम, संध्या मेढे, अशोक सब्बन, संजय झिंजे, शाकीर शेख आदींनी आंदोलनस्थळी दाखल होत हजारे यांना पाठिंबा दिला. विविध विद्यार्थ्यांनी नीट परीक्षार्थींच्या आत्महत्येकडे लक्ष वेधत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. धर्मेंद्र प्रधान यांच्या धिक्काराच्या घोषणाही देण्यात आल्या.

तत्पूर्वी अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली तसेच दिल्ली येथील आंदोलनात सहभागी असणार्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराच्या घटनेची चिंता व्यक्त करत विद्यार्थ्यांशी लोकशाही मार्गाने चर्चा करण्याची मागणी केली.

लोकशाहीत जनतेचा आवाज दडपून नव्हे तर संवादातून प्रश्न सोडवावा. विद्यार्थी व पालक मागील २५ दिवसांपासून शांततेच्या मार्गाने आंदोलन करत मंत्र्यांचा राजीनामा मागत आहेत.

## टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी सोहळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**खारेकर्जुने :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी भक्तिभावाने पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होत असतानाच, हिंगणगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल हिंगणगाव आणि जिल्हा प्राथमिक शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सहभागातून भव्य विद्यार्थी वारकरी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिंडी सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर विठ्ठल नामघोष, टाळ-मृदंगाचा गजर आणि अभंगांच्या स्वरांनी दुमदुमून गेला.

या दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत वारकरी वेशभूषा परिधान केली होती.

अनेक विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात सहभागी झाले होते. हातात भगव्या पताका, गळ्यात टाळ, मृदंगाचा निनाद आणि मुखातून निघणारा 'ज्ञानोबा-तुकाराम', 'जय जय रामकृष्ण हरी', 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'चा जयघोष यामुळे दिंडीला पंढरीच्या वारीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी सादर केलेले रिंगण, पावली, फुगडी तसेच बालवारकऱ्यांनी सादर केलेले अभंग उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले.

पारंपरिक वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या विविध उपक्रमांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, संस्कार, शिस्त, एकात्मता आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख निर्माण व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

यावेळी ह.भ.प. श्रीनिवास महाराज जपकर, सरपंच पोपट ढगे, डॉ. सुनील गंधे, आबासाहेब सोनवणे, भाऊसाहेब झावरे, नाजीर सय्यद, बन्सी दरंदले, पांडुरंग सोनवणे, विजय वाघमारे, रावसाहेब दाते, अमोल सोनवणे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि गावातील विठ्ठलभक्त दिंडीमध्ये सहभागी झाले. दिंडी सोहळ्यात पालखी पूजन, विद्यार्थ्यांची वारकरी वेशभूषेतील पायी दिंडी, अभंग-टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनाम संकीर्तन आदी कार्यक्रम उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## चिमुकल्यांच्या बालदिंडीचे उत्स्फूर्त स्वागत



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** आषाढी एकादशीचे औचित्य साधत कोरडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बालदिंडीने संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. आज सकाळी दहा वाजता निघालेल्या या अनोख्या बालदिंडीत जि.प. शाळा व अंगणवाडीतील चिमुकल्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या बालगोपाळांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमासाठी शाळेचे शिक्षक राणा सर, भताने सर यांच्यासह सर्व शिक्षिका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी विशेष परिश्रम घेतले. बालवयातच अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक एकोप्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी मनापासून स्वागत केले. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार, शिस्त आणि सांस्कृतिक परंपरेबद्दल आत्मीयता निर्माण होते, अशा भावना अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.



## वृक्ष लागवड व संवर्धन हीच खरी समाजसेवा व विठ्ठलभक्ती : पवार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पंढरपूरला आषाढी वारीसाठी अहिल्यानगर शहरातून गेलेल्या वारकऱ्यांनी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. लायन्स क्लब व निसर्ग व सामाजिक प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात एच. बी. लामकाते, कुर्मदास साखर राहुल पाटील, हनुमंत लांडे, विशाल मिस्किन, जे. के. काळे, बँकेचे कर्मचारी तसेच आषाढी वारीतील वारकरी सहभागी झाले. दिंडीतील छायाताई राजपूत, सुषमा दंडवते, पुष्पा वाकळे, संगीता देव्हारे, अनुसया दंडवते, सुनीता कानडे, गंगुबाई वाघ, सपना लाटे, केशर गांगर्डे, मंगल चव्हाण आणि शारदा दळवी यांच्यासह अनेक वारकऱ्यांनी वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

## भोयरे गांगर्डा येथे नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा आणि ग्रामपंचायत भोयरे गांगर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे, राहुल शिंदे, दत्ता नाना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच संतोष केकडे, आदिनाथ गायकवाड, गणेश बनकर, राहुल दादा शिंदे, दत्ता पवार, मनोज मुंगसे, लहु भालेकर, भाऊसाहेब भोगडे, दौलतराव गांगड, किशोर रसाळ, मेजर केकडे, युवराज पाटील डोंगरे, माणिक पवार, सचिन रसाळ, अक्षय भोगाडे, अक्षय गरदारे, दादासाहेब जवक, गणेश गायकवाड, राजेंद्र गांगड, मेजर प्रमोद रसाळ, विवेक गायकवाड, शेखर पवार, तात्यासाहेब रसाळ, अशोक पवार, शिवाजी रसाळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## ग्रीन सिटीच्या ट्री बँकेला धनश्री विखे यांची भेट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरात उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत उभारण्यात आलेल्या 'ट्री बँकेला' धनश्री सुजय विखे पाटील यांनी भेट देऊन विविध देसी वृक्षांची सविस्तर माहिती घेतली. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि वृक्ष संगोपनासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे त्यांनी मनापासून कौतुक करत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हरित अहिल्यानगर घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

अहिल्यानगर महानगरपालिका व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या ट्री बँकेला भेटीदरम्यान उपमहापौर ड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक निखिल वारे, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, ग्रीन आर्मीचे प्रा. हर्षल आगळे, इंजिनिअर कैलास दिघे, प्रताप काळे आदी उपस्थित होते.

यावेळी धनश्री विखे पाटील म्हणाल्या की, उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेली नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहीम ही पर्यावरणाचे संरक्षण आणि पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत कौतुकास्पद उपक्रम आहे. आपले शहर हिरवेगार व्हावे आणि ग्रीन सिटी म्हणून ओळख निर्माण व्हावी, यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाला पर्याय नाही. आज मोठ्या प्रमाणावर शहरीकरण होत असून नवीन शहरांच्या उभारणीसाठी जंगलतोड होत आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण व संवर्धनाची लोकचळवळ उभी करणे आवश्यक आहे.

## सोमवार पासून फिरोदियात फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या आणि शालेय फुटबॉलमधील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित ८ व्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला सोमवार, पासून अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर प्रारंभ होत आहे. रोजी सकाळी १०.३० वाजता फुटबॉल स्पर्धेचा थरार रंगणार आहे. ही स्पर्धा अहमदनगर महाविद्यालयाच्या सौजन्याने व अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे मुख्य विश्वस्त व फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया तसेच शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष व फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या विशेष पुढाकाराने पार पडत आहे.

### जामखेड कडकडीत बंद

# केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी; तहसीलवर मोर्चा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** विद्यार्थ्यांवर लाठीमार करणे ही लोकशाहीची शोकांतिका आहे, त्यांच्यावर दडपशाही नव्हे तर त्यांना न्याय मिळाला पाहिजे.विद्यार्थ्यांवर हल्ला करणारे नेमके कोण होते? ते कोठून आले? त्यांच्या हातात दांडके कसे आले? वाहनांमध्ये दगड कोठून आणले गेले? संपूर्ण घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर कठोर कारवाई झाली नगरसेवक ड. अरुण जाधव यांनी केंद्र सरकारवर टीका करत, नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

नीट परीक्षेतील कथित गैरप्रकाराच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या अमानुषपणे लाठीमारच्या निषेधार्थ गुरुवारी जामखेड शहरात वंचित बहुजन आघाडी तसेच सर्वपक्षीयांनी निषेध मोर्चा तहसील कार्यालयावर काढून बंद पाळण्यात आला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी तहसीलदार धनंजय बांगर यांना निवेदन दिले.

या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, आम आदमी पार्टी, शिवसेना(उबाठा), प्रहार जनशक्ती पक्ष, काँग्रेस, आदिवासी संघटना, लोकाधिकार आंदोलन, मुस्लिम पंच कमिटी आदी संघटनांनी पाठिंबा दिला. जामखेड शहरात व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून बंद यशस्वी केला.

आंदोलनाच्या समारोपावेळी दिल्लीतील आंदोलनादरम्यान मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आलेल्या विद्यार्थिनीला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांवरील कथित अत्याचाराचा निषेध नोंदवून दोषींवर कारवाई करण्याची आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी राजेंद्र कोठारी, अजर काझी, अवधूत पवार, प्रदीप टापरे, रमेश आजबे, ॲड. मयुर डोके, नय्युम सुभेदार, संतोष नवलाखा, प्रकाश काळे, बापूसाहेब ओव्होळ, इस्माईल सय्यद, विकी सदाफुले, प्रा. लक्ष्मण ढेपे, माजीद कुरेशी, रवि शेळके, निखिल घायतडक, मुकुंद घायतडक, रंजित मेघडंबर, नगरसेविका संगीता भालेराव, नगरसेवक वसिम सय्यद, नगरसेवक प्रशांत राळेभात, प्रा.कुंडल राळेभात, ॲड. हर्षल डोके, जुबेर शेख, सरपंच बाळासाहेब खैरे, बापूसाहेब कार्ले, मच्छिंद्र जाधव, सचिन शिंदे, गणेश हगवणे, ॲड.बाळासाहेब घोडेस्वार, हरिभाऊ आजबे, प्रा.धनंजय भोसले, स्वप्निल खाडे, रजनी औटी, सुरज भालेराव, ऋषिकेश गायकवाड, सागर कांबळे, विकी पिंपळे, विशाल जाधव, पिंटू जाधव, नितीन जाधव विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.

## वृक्षारोपण हा उपक्रम कौतुकास्पद : डॉ.टीपरसे

**अहिल्यानगर :** वातावरणातील बदल पाहता यंदाचा पावसाळा हा एक महिना उशिरा आहे. तसेच वनक्षेत्रातील व रहिवासी परिसरातील झाडेही कमी झालेली दिसत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष संवर्धन करणे व वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. पंडित दीनदयाळ परिवार ट्रस्ट व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचे कार्यक्रम होत आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे. असे प्रतिपादन पोलीस उपाधीक्षक डॉक्टर दिलीप टिपरसे यांनी केले. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देववृक्ष लागवड व संवर्धन अभियानांतर्गत सिव्हील हडको येथील रामकरण सारडा विद्यार्थीगृहात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी पो. उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे, वसंत लोढा, ब्रिजलाल सारडा, मधुसूदन सारडा, अनंत देसाई, धनंजय तागडे, बाळासाहेब भुजबळ, सुरज अग्रवाल, अशोक कानडे, राहुल जामगावकर, मिलिंद कोलते उपस्थित होते.

### नीट पेपरफुटी, शिक्षणातील भ्रष्टाचार

# भिंगार शहर बंद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भिंगार शहरातील विविध भागांत बंद पाळण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांना शांततेच्या मार्गाने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय अध्यक्ष अँड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली व पक्षाच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतर व संसदेसमोर देशभरातील विद्यार्थी, युवक व पालकांनी शांततापूर्ण आंदोलन केले होते. मात्र या आंदोलनाकडे दुर्लक्ष करून आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

या कारवाईत अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा तसेच काही आंदोलकांना अटक करून त्यांच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेली कारवाई निषेधार्ह असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकारने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात हनिफ शेख, योगेश साठे, सोमनाथ भैलुमे, दीपक ससाणे, प्रवीण ओरे, सुहास धीवर, सुरेश पानपाटील, देविदास भालेराव, सुधीर धामणे, ॲड. योगेश गुंजाळ, कर्जत तालुकाध्यक्ष पोपट शेटे, चंद्रकांत नेटके, अंकुश साळवे, जीवन कांबळे, संकेत शिंदे, प्रतीक ठोकळ, संजय शेलार, राजीव भिंगारदिवे, अमर निरभवने, बाजीराव राजगुरू, संध्या मेढे, अविनाश साठे, आढाव यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# चला पंढरीला जाऊ

चला पंढरीला जाऊ,
चला पंढरीला जाऊ;
रूप विठूचे आपण,
डोळे भरून हो पाहू. ।।१।।
चंद्रभागा नदीतिरी,
घेऊ हरीचे दर्शन;
पंढरीच्या वाटेवर,
पांडुरंग आकर्षण. ।।२।।
विठू सावळा भेटावा,
हीच लागलीय आस;
मुखी अखंड नामाचा,
मनी धरलाय ध्यास. ।।३।।
उभा श्रीहरी सुंदर,
शोभे कर कटीवरी;
बघा रुक्मिणी रुसली,
उभी हरीच्या शेजारी. ।।४।।
नाद टाळ-मृदंगाचा,
कानी पडला मधुर;
माझ्या गोविंदाचे बघा,
रूप दिसे मनोहर. ।।५।।

**कवयित्री :**
**अलका भवारी / कोंढवळे**

# पुणे बँकेकडून कर्जदारांचा तपशील पोर्टलवर अपलोड : जिल्हाधिकारी डुडी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यशासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्यादृष्टीने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'-२०२६ च्या अंमलबजावणीअंतर्गत पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून जिल्ह्यातील १ लाख ८ हजार ४१ थकीत कर्जदारांचा तपशील पोर्टलवर अपलोड करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्यादृष्टीने त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देशाने ही योजना जाहीर करण्यात आली आहे. सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण कार्यालयाच्यावतीने या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेला कर्जदारांचा तपशील पोटर्लवर माहिती अपलोड करण्याचे आवाहन केले असता बँकेच्यावतीने संपूर्ण कर्जदार खातेदाराची माहिती पोर्टलवर अपलोड केली आहे.

जिल्ह्यातील ११३ शेतकरी पात्र असूनही मयत असल्याने व अशा शेतकऱ्यांची वारस नोंद न झाल्याने अशा खात्याची माहिती अपलोड करता आलेली नाही. तसेच २९ सभासद लाभ घेण्यास पात्र असूनही त्यांचे आधार क्रमांक उपलब्ध नसल्याने यांची माहिती पोर्टलवर अपलोड करता आलेली नाही. त्यामुळे मयत सभासदांच्या वारसांनी वारस नोंद तात्काळ करुन घ्यावी व आधार क्रमांक नसलेल्या सभासदांनी आधार क्रमांक उपलब्ध करून घ्यावा, जेणे करून त्यांची महिती पोर्टलवर अपलोड करता येईल, असेही आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

### अपलोड करण्यात आलेली तालुकानिहाय कर्जदार खातेदार संख्या

**बँकेकडून कर्ज तपशील अपलोड केलेल्या खातेदारांची संख्या आंबेगाव तालुक्यात ३ हजार ३९०, बारामती १३ हजार ७२८, भोर ७ हजार २४२, दौंड १९ हजार ५६२, हवेली ४ हजार १६८, इंदापूर १८ हजार ८१८, जुन्नर ७ हजार ७७८, खेड ७ हजार ८५३, मावळ ५ हजार १७२, मुळशी २ हजार ३८७, पुरंदर ७ हजार ९०३, शिरुर ८ हजार ४५२ आणि वेल्हा १ हजार ८८८ थकीत कर्ज खातेदार याप्रमाणे आहे.**

# शिक्रापूर पोलिसांचा हानिकारक पान विकणाऱ्या शॉपवर छापा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तळेगाव रोड परिसरात एका पान शॉपवर गुंगीकारक पदार्थ टाकून पान बनवले जात असल्याने शिक्रापूर पोलिसांच्या पथकाने पान शॉपवर छापा टाकत अपायकारक पावडर जप्त करत सतीश नानासाहेब खरे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तळेगाव रोड परिसरात चव्हाण कॉम्प्लेक्स समोर सिद्धेश्वर पानवाला या पान शॉप मध्ये मानवी शरीराला अपायकारक अशी पावडर टाकून पान बनवले जात असून सदर पान धोकादायक असल्याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना मिळाली, त्यांनतर पोलीस हवालदार संदीप कारंडे व पोलीस शिपाई नागेश वाघमारे यांनी सदर पान शॉप येथे छापा टाकत पाहणी केली असता पोलिसांना कोणतेही नाव अथवा लेबल नसलेली उग्र वासाची पावडर वापरुन पान बनवले जात असल्याचे निदर्शनास आले, दरम्यान पोलिसांनी सदर पावडर जप्त करत पान शॉप चालकाला ताब्यात घेतले, याबाबत पोलीस शिपाई नागेश कचरू वाघमारे (रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सतीश नानासाहेब खरे (वय ३२ वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अंकुश कारंडे हे करत आहे.

# द•ख•ल

## शिक्रापुरात दुसऱ्या मजल्यावरून पडल्याने एकाचा मृत्यू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील मलठण फाटा येथे घराची साफसफाई करताना दुसऱ्या मजल्याच्या स्लॅबवरून पडल्याने ज्ञानोबा तानाजी मोरे या इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शिक्रापूर (ता. शिरूर) येथील मलठण फाटा परिसरात साईबाबा मंदिराजवळ राहणारे ज्ञानोबा मोरे यांच्या मुलीचे लग्न असल्याने ते घरातील साफसफाई करत होते, घराच्या दुसऱ्या मजल्यावर जाऊन साफसफाई करत असताना ज्ञानोबा मोरे हे घसरून जमिनीवर पडून गंभीर जखमी झाले, दरम्यान गंभीर जखमी झालेल्या ज्ञानोबा मोरे यांना नागरिकांनी उपचारासाठी शिक्रापूर येथे रुग्णालयात दाखल केले मात्र ज्ञानोबा यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचाराकरीता पुणे येथे घेऊन जात असताना ज्ञानोबा धनाजी मोरे (वय ४३ वर्षे रा. मलठण फाटा, कॅनल रोड साईबाबा मंदिर जवळ शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांचा मृत्यू झाला, घडलेल्या घटनेबाबत विनायक ज्ञानोबा मोरे (वय २४ वर्षे रा. मलठण फाटा, कॅनल रोड साईबाबा मंदिर जवळ शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश मुटेकर हे करत आहे.

## शिरूर शहराच्या प्रवेशद्वारावरच खड्ड्यांचे साम्राज्य



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर शहरात प्रवेश करताच जोशीवाडी परिसरातील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करत प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांच्या खोलीचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. जोशीवाडी हा शिरूर शहरातील महत्त्वाचा प्रवेशमार्ग असल्याने या रस्त्यावरून दररोज हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी, कर्मचारी तसेच मालवाहू वाहने ये-जा करतात. मात्र रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असून वाहनचालकांना वाहने सावकाश चालवावी लागत आहेत. दुचाकीस्वारांना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागत असून किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत असल्याचे नागरिकांनी सांगितले.स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाचे लक्ष वेधूनही रस्त्यावरील खड्डे बुजविण्याबाबत ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## संविदणे येथे भरदिवसा धाडसी घरफोडी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील संविदणे येथे काल बुधवार दि. २१ रोजी भरदिवसा घरफोडीची घटना घडून अज्ञात चोरट्याने तब्बल १७ तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोंदेवाडी मार्गे एसटी बस सेवा तातडीने सुरू करा; ग्रामस्थांची मागणी



**दळणवळण सुलभ व्हावे यासाठी माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी काठापूर बुद्रुक ते पोंदेवाडी सिमेंट कॉंक्रीट रस्त्यासाठी कोट्यवधी रुपये निधी मंजूर केला होता सदर रस्ताचे काम पूर्ण झाले असून रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला आहे पोंदेवाडी लोणी एसटी सेवा रस्त्या अभावी बंद झाली आहे एसटी बस सेवा पूर्ववत करण्यासाठी लवकरच पत्र व्यवहार करणार आहे**

**अंकिता वाळुंज**
पंचायत समिती सदस्या आंबेगाव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** पोंदेवाडी ( ता . आंबेगाव ) येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) बस सेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी पोंदेवाडीचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर यांनी केली आहे.

माजी मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून काठापूर बुद्रुक ते पोंदेवाडी या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे पोंदेवाडी फाटा ते पोंदेवाडी गाव हा मार्ग अनेक दिवस वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. परिणामी, या मार्गावरील एसटी बस सेवा बंद झाली होती.

एसटी सेवा बंद असल्याने शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच रोजच्या प्रवासासाठी एसटीवर अवलंबून असलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अत्यावश्यक सेवांसाठीही नागरिकांची गैरसोय झाली असून खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागले. आता रस्त्याचे काम पूर्ण होऊन मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला आहे. त्यामुळे पोंदेवाडी मार्गे 'लाल परी'ची सेवा तात्काळ सुरू करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. एसटी बस सेवा सुरू झाल्यास विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांची मोठी सोय होणार असल्याचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर यांनी सांगितले. त्यांनी संबंधित प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन पोंदेवाडी मार्गे एसटी बस सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त नटराज नाट्य कला मंडळाच्या वतीनं उभारण्यात आलेल्या पूर्णाकृती ब्राँझ पुतळ्याचे अनावरण उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते नटराज नाट्य कला मंडळ, तिरंगा सर्कल येथे लोकार्पण करण्यात आले. यावेळी श्रीमती सुनेत्रा पवार तसेच जय पवार यांनी पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर ,नगराध्यक्ष सचिन सातव, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, पवार कुटुंबीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर श्रीमती पवार यांच्या हस्ते दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जीवनावर आधारित छायाचित्र दालनाचे लोकार्पण करण्यात आले. त्यांनी या दालनाला भेट देऊन छायाचित्रांची पाहणी केली. पोलीस बँड पथकाच्यावतीने पुतळ्यास मानवदंना देण्यात आली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अभिवादनाप्रित्यर्थ सर्वधर्मीय प्रार्थना घेण्यात आली. तसेच निलिमा नृत्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गीत वदंना सादर केली.

# पाबळ येथील धनश्री गव्हाणे यांची औषध निरीक्षक पदाला गवसणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**तळेगाव ढमढेरे :** पाबळ (ता. शिरुर) येथील थापेवाडीतील धनश्री निळकंठ गव्हाणे - पुंडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून घवघवीत यश संपादित करत औषध निरीक्षकपदाला गवसणी घालून शिक्रापूर, कान्हूर मेसाई सह पाबळ गावचे नाव उज्वल केले असून विवाहानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत मिळवलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पाबळ (ता. शिरुर) येथील धनश्री गव्हाणे या शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या पत्नी असून शिक्रापूर येथील उद्योजक व कान्हूर मेसाई शिक्षण संस्थेचे संचालक सदाशिव पुंडे यांची मुलगी आहे. धनश्री यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिक्रापूर येथे तर पुढील पदवीचे शिक्षण सिंहगड कॉलेज पुणे येथे झाले. विवाहानंतर कुटुंबियांच्या पाठबळाने अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून कुटुंब सांभाळून अभ्यास करत मुंबई येथे ड्रग्ज रेग्युलेटरी अफेअर्स तसेच सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरी केली. धनश्री गव्हाणे - पुंडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली असता त्या परीक्षेत यश मिळवत औषध निरीक्षक पदी निवड झाली आहे, तर निवडीबाबत बोलताना लहानपणापासून शिक्षणाची आवड व लग्नानंतर पती व कुटुंबियांचे मिळालेले पाठबळ यामुळे मी देखील अधिकारी झाले असून सध्या औषध निर्माणशास्त्र मध्ये पीएचडीचे शिक्षण सुरु असल्याचे धनश्री निळकंठ गव्हाणे - पुंडे यांनी सांगितले तर धनश्री यांच्या यशामुळे महाविद्यालयीन युवक युवतींपुढे एक आदर्श निर्माण झाला आहे.

**पाबळ येथे एकाच घरात चार अधिकारी . . .**

**पाबळ (ता. शिरुर) येथील थापेवाडी मधील धनश्री गव्हाणे - पुंडे या नुकत्याच औषध निरीक्षक झाल्या असताना त्यांचे सासरे गणपत गव्हाणे सेन्ट्रल रेल्वेतून निवृत्त झाले आहेत तर पती निळकंठ गव्हाणे शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी तर दीर देवेंद्र गव्हाणे बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी सहाय्यक तर जाऊ प्राजक्ता गव्हाणे या मंत्रालय कक्ष अधिकारी पदावर कार्यरत असल्याने एकाच कुटुंबातील चार अधिकारी बनण्याचा विक्रम गव्हाणे कुटुंबीयांनी केला आहे.**

# बारामती शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण अभिवादन..!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री तथा लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त (दि:२२) रोजी बारामती शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने शहर पक्ष कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच अमर रहे... अमर रहे... अजितदादा अमर रहे... या घोषणांनी पक्ष कार्यालयाचा परिसर दुमदुमून गेला.

या प्रसंगी बारामती शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष ड. किरण इंगळे, नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, माजी नगराध्यक्ष कैलास चव्हाण, युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, माजी नगराध्यक्ष इम्तियाज शिकीलकर, पुणे जिल्हा उपाध्यक्ष प्रताप पागळे, पुणे जिल्हा सरचिटणीस प्रा. आजिनाथ चौधर, विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते यांच्यासह बारामती नगर परिषदेचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, सभापती, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहर कार्यकारणी, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, विविध सेलचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी, ज्येष्ठ पदाधिकारी तसेच पक्षाचे असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी होते. उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या विकासाच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमात उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाचा, जनसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा आणि समाजकारणातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या २२ जुलै रोजी विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले. यामध्ये ज्योतिबा मंदिर येथे महाआरती, मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृद्धाश्रमातील महिलांना साडी वाटप, वृक्षारोपण, पुणे-बारामती सायकल स्पर्धा, गुरुद्वारामध्ये अखंड पाठ तसेच पावसाळी रेनकोट वाटप असे विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी सांगितले की, दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने संपूर्ण महिनाभर जनसेवा महिना विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत असून, समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याला खरी आदरांजली वाहण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

# दादांच्या जयंतीनिमित्त भोकरवस्तीत वृक्षारोपणाचा संकल्प

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**वळती :** लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोकरवस्ती येथे भावपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दादांच्या स्मृतींना उजाळा देताना उपस्थित ग्रामस्थ, विद्यार्थी आणि दादाप्रेमी भावुक झाले. दादांच्या कार्याची आणि पर्यावरणप्रेमाची आठवण काढत त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून वृक्षारोपण व वृक्षवाटप उपक्रम राबविण्यात आला.

स्व. अजितदादा पवार यांना पर्यावरण संवर्धनाची विशेष आवड होती. त्यांच्या स्मरणार्थ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोकरवस्ती परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यानंतर वळती गाव व परिसरातील नागरिकांना घरोघरी जाऊन वृक्षांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प करत दादांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे केले होते. कार्यक्रमास दादाप्रेमी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी निखिल भोर, विठ्ठल गांजवे, अतुल भोर, संतोष शिंदे आणि विकास भोर यांनी मनोगत व्यक्त करत स्व. अजितदादा पवार यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब इंदोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.स्नेहल लोखंडे यांनी मानले.


## हरवले आहेत


**सौ.सुमन सुभाष पांगारे**


**कु.राणी सुभाष पांगारे**

तमाम नागरीकांस जाहिर आवाहन करण्यात येत आहे की वरील फोटोतील दोन्ही महिला हरवल्या आहेत. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे.
**(१) सौ. सुमन सुभाष पांगारे (वय वर्षे ६५) राहणार दिवळे, ता. भोर, जि. पुणे** यांची उंची ५ फुट ७ इंच, अंगाने मध्यम, पांढऱ्या रंगाची साडी नेसलेली असून पायात निळ्या रंगाची चप्पल आहे. रंग सावळा, केस काळे पांढरे असून मराठी भाषा बोलतात.
**(२) कु. राणी सुभाष पांगारे (वय वर्षे ३०) राहणार दिवळे, ता. भोर, जि. पुणे** यांची उंची ५ फुट २ इंच, अंगाने मध्यम, निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस नेसलेली असून पायात निळ्या रंगाची चप्पल आहे. रंग गोरा, केस काळे असून मराठी भाषा बोलतात.या दोघी मनोरुग्ण असून त्यांच्यामध्ये आई व मुलगी असे नाते आहे. या दोघी दिनांक ५/१/२०२६ रोजी सकाळी १० वाजेदरम्यान मौजे दिवळे, ता. भोर, जि. पुणे येथील राहत्या घरातून कोणास काही न सांगता कोठेतरी निघून गेल्या आहेत. वरील वर्णनाच्या व्यक्ती कोणाच्या निदर्शनास आल्यास राजगड (जि. पुणे) पोलीस स्टेशनशी संपर्क करावा, किंवा **मोबाईल नंबर ९७६३१६६१६८, ९६३७५०७२७१, ८६६८५८५३६३ वर संपर्क करावा.**

# दिवाळीत गावगाड्याचा रणसंग्राम ! तालुक्यात ६७ ग्रामपंचायतींचे बिगुल

## प्रशासकराजला मिळणार पूर्णविराम; ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** तालुक्यातील तब्बल ६७ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला असून गेली दोन वर्षे प्रशासकांच्या हाती असलेला गावकारभार आता लोकप्रतिनिधींकडे सोपविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दिवाळीच्या तोंडावर या निवडणुका होण्याची शक्यता असल्याने ग्रामीण भागातील राजकारण तापण्यास सुरुवात होणार आहे. गावोगावी इच्छुकांची लगबग, बैठका, पॅनेल जुळवाजुळव आणि राजकीय समीकरणांना वेग येणार असून प्रत्येक गावात निवडणुकीचा माहोल रंगणार आहे.

जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपलेल्या ६७ ग्रामपंचायतींसाठी निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी या निवडणुकांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे. २४ जुलै रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार असून ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी जाहीर केली जाणार आहे.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यानंतर आता मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम संगणक प्रणालीद्वारे सुरू झाले आहे. तहसील प्रशासनाकडून प्रत्येक ग्रामपंचायतीची विधानसभा व प्रभागनिहाय माहिती संकलित करून प्रणालीवर अपलोड केली जात आहे.

तालुक्यात २०२६ मध्ये मुदत संपलेल्या ६० तर २०२४ मध्ये मुदत संपलेल्या ७ अशा एकूण ६७ ग्रामपंचायतींवर सध्या प्रशासकांमार्फत कारभार सुरू आहे. निवडणुका रखडल्याने अनेक गावांतील विकासकामांचा वेग मंदावल्याची भावना नागरिक आणि इच्छुक उमेदवार व्यक्त करत आहेत. लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने गावपातळीवरील प्रश्न सोडविण्यात अडचणी येत असल्याची चर्चा ग्रामीण भागात आहे.

राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्यामुळे रखडलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे दिवाळीच्या उत्सवी वातावरणातच गावकीच्या निवडणुकांचा धुरळा उडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**६७ गावांत राजकीय रणधुमाळी!**

पिंपळगाव माळवी, धनगरवाडी, दरेवाडी, हमीदपूर, वाकोडी, निमगाव घाणा, शिंगवे नाईक, हिवरेबाजार, नवनागापूर, निमगाव वाघा, देहरे, पिंपळगाव वाघा, कर्जुनेखारे, चास, निबंळक, कामरगाव, विळद, अकोळनेर, पिंपरी घुमट, भोरवाडी, इसळक, घोसपुरी, बाराबाभळी, चिचोंडी पाटील, वडारवाडी, मांडवे, शहापूर केकती, सांडवे, नागरदेवळे, दशमीव्हाण, माथणी, टाकळी काझी, खांडके, कोल्हेवाडी, बुऱ्हाणनगर, आंबिलवाडी, वारुळवाडी, हातवळण, देवगाव, मठपिंप्री, रतडगाव, रईछत्तीसी, पोखर्डी, गुणवडी, इमामपूर, वाळुंज, ससेवाडी, पारगाव मौला, बहिरवाडी, शिराढोण, उदरमल, वाटेफळ, मांजरसुंबा, तांदळी वडगाव, डोंगरगण, खडकी, खोसपूरी, खंडाळा, जेऊर, गुंडेगाव, भोयरे पठार, भोयरे खुर्द, पारेवाडी, पारगाव भातोडी, आव्हाडवाडी, मजले चिंचोली, बुरूडगाव या गावांनी निवडणुकीचा रणसंग्राम पाहावयास मिळणार आहे.




दोन वर्षांपासून अनेक ग्रामपंचायतींचा प्रशासकांकडे कारभार आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने विकासकामांचा पाठपुरावा कमी झाला आहे. गावांच्या सर्वांगीण विकासासाठी रखडलेल्या ग्रामपंचायत निवडणुका तातडीने घेणे आवश्यक आहे.

**–बापुसाहेब आव्हाड**
**(माजी सरपंच, पांगरमल)**

# आई वडिलांच्या कृपेने मी वैद्यकीय सेवा निवडली : सुसे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** बालपणात शिक्षण घेत असताना मी संकल्प केला होता की, काही असो मात्र मला भविष्यात वैद्यकीय सेवेमध्ये जायचे आहे. आणि तो माझा ठरवलेला संकल्प माझ्या आई आणि वडिलांच्या कृपाशीर्वादाने मी पुर्णकरण्यामध्ये यशस्वी होत आहे.असे प्रतिपादन शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील गरीब शेतकरी कुटुंबातील असणाऱ्या सावता नामदेव सुसे यांची मुलगी गायत्री सावता सुसे हिने व्यक्त केले आहे. गायत्रीने नुकत्याच पार पडलेल्या वैद्यकीय सेवा परीक्षेमध्ये भरघोष असे यश प्राप्त केले असल्याने तिचा सन्मान हातगाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने नुकताच करण्यात आला असून त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना गायत्री बोलत होती. यावेळी डॉ. शंकर गाडेकर, रामनाथ राजपुरे, संजय गलांडे, नितेश पारनेरे, साळुंके, अंकुश जोगदंड, डॉ. अरुण भिसे, अरुण मातंग यांनीही आपले विचार व्यक्त करत गायत्रीला शुभेच्छा दिल्या असून या कार्यक्रमासाठी पाथर्डीचे सहाय्यक निबंधक गोकुळ नागरे, मोहनराव गलांडे, राजेंद्र ढमढेरे, संतोष वीर, सचिन भराट, नंदू म्हस्के, सुखदेव जमदडे, तात्यासाहेब दिवटे, श्रीराम चव्हाण, सुभाष बारगजे, गणेश पवार, संजय दारूणकर, विजय मोरे, सुसे परिवारातील सर्व नागरिक यांच्यासह असंख्य प्रमुख ग्रामस्थ उपस्थित होते.

## द•ख•ल

### प्रा.शांता गडगे यांना पी.एच.डी.



**टाकळी ढोकेश्वर :** श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्राध्यापीका शांता गडगे यांना इतिहास विषयातील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील निवडक मराठी व हिंदी चित्रपटामधून दिसून येणारे महिला सबलीकरण : एक चिकित्सक अभ्यास (१९४७-२०१०) या संशोधनप्रबंधासाठी विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी मिळाली आहे. हा संशोधनप्रबंध न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहिल्यानगर येथील संशोधन केंद्रात डॉ. मीना साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. प्रा.शांता गडगे यांना मिळालेल्या यशाबद्दल रामचंद्र दरे, डॉ.विवेक भापकर, अॅड. विश्वासराव आठरे, मुकेश मुळे, अॅड. दिपलक्ष्मी म्हसे, सिताराम खिलारी, डॉ.भाऊसाहेब खिलारी तसेच जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी, ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ.वीरेंद्र धनशेट्टी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# राशीनमध्ये सर्वपक्षीय निषेध रॅली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** राशीन शहरात आज पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थिनीच्या आत्महत्येची घटना तसेच आंदोलकांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ विविध सामाजिक, राजकीय व आंबेडकरी संघटनांनी एकत्र येत तीव्र संताप व्यक्त केला. सर्वपक्षीय व समविचारी नागरिकांनी एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भव्य निषेध रॅली काढली.

ही रॅली महात्मा फुले चौक मार्गे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहोचली. यावेळी शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

या आंदोलनात अंकुश साळवे, पोपटराव शेटे, दादासाहेब आढाव, दत्तात्रय सोनवणे, अॅड. शुभम पानसरे, अनिल आढाव, अॅड. आकाश साळवे, मुकुंद आढाव, जितेंद्र शेटे, सुभाष जाधव, गणेश कदम, रामकिसन साळवे, भीमराव साळवे, शरद आढाव, गोट्या धनवे, अॅड. विकी साळवे, आकाश साळवे, अतुल साळवे, बबलू परदेशी, मधुकर दंडे, संतोष ढावरे, विशाल धनवडे, किरण जाधव, सागर पघी, बबलू कुरेशी यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# प्रशासकिय इमारतीचे ना. शिंदेंच्या हस्ते लोकार्पण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** पाटेगाव सोसायटीची स्थापना स्वातंत्र्यपूर्वीची असून त्याची प्रशासकीय इमारत देखील सुंदर असावी ही अपेक्षा सर्वांची पूर्ण झाली. शेतकरी कर्जमाफी कालच झाली त्याची पहिली यादी देखील प्रसिद्ध झाली. महायुती सरकार शेतकऱ्यांसाठी कटिबद्ध असून नुसत्या घोषणा करीत नाही तर त्याची अंमलबजावणी देखील करते. काम केले तर कौतुक व्हायलाच पाहिजे. नाहीतर ते काम लोकांच्या निदर्शनास येत नाही. त्यामुळे काम करणाऱ्या लोकप्रतिनिधीच्या पाठीमागे जनतेने देखील उभा राहीले पाहिजे. भोसेखिंडसाठी अड कैलास शेवाळे यांनी १४ वर्ष चप्पल त्याग केला. आणि ती योजना पूर्ण केली. त्यांचे राजकीय, सामाजिक कार्य निश्चित इतरांसाठी अनुकरनीय आहे असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केले. ते पाटेगाव (ता.कर्जत) विका सोसायटीच्या सर्व सुविधायुक्त नवीन प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी अॅड कैलास शेवाळे, अंबादास पिसाळ, बाळासाहेब साळुंके, काकासाहेब तापकीर, राजेंद्र फाळके, अॅड. हर्षद शेवाळे, लहू वतारे, संग्राम पाटील, शांतीलाल कोपनर, राजेंद्र गुंड, अड शिवाजी अनभुले, अनिल गदादे, अशोक खेडकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक करताना अड हर्षद शेवाळे म्हणाले की, पाटेगाव विका सोसायटीची इमारत एक आदर्शवत असावी अशी सर्व संचालकांची इच्छा होती. त्यानुसार काही निधी स्वता उभारला.

# पाथर्डी तालुक्यात वाचनालये केवळ कागदावरच!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये वाचन संस्कृती जोपासण्यासाठी शासनाकडून लाखो रुपयांचे अनुदान दिले जात असले तरी, प्रत्यक्षात मात्र तालुक्यातील बहुतांश वाचनालये केवळ कागदावरच उरली असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे. वाचनालयांच्या नावाखाली येणारा सरकारी निधी हडप करण्याचा जणू सपाटाच काही स्वार्थी संस्थाचालकांनी लावला असून, प्रशासकीय यंत्रणेच्या डोळ्यांदेखत हा प्रकार सुरू असल्याने सर्वसामान्य नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये वाचनालयांच्या इमारतींना बाराही महिने कुलूप असते, तर काही ठिकाणी वाचनालयाची साधी पाटीही शोधून सापडत नाही. नियमानुसार ग्रंथालयांमध्ये दैनंदिन वर्तमानपत्रे, नियतकालिके आणि वाचकांसाठी दर्जेदार पुस्तके असणे अनिवार्य आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक वाचनालयांमध्ये वाचकांसाठी बसण्याची सोय तर दूरच, साधी पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही उपलब्ध नाही.

### निधी लाटण्याचा संस्थाचालकांचा सपाटा

धक्कादायक बाब अशी की, प्रत्यक्षात वाचनालय बंद असतानाही सरकारी दप्तरी मात्र वाचकांची मोठी गर्दी असल्याचे भासवून बनावट सह्यांची हजेरी पत्रके तयार केली जात आहेत. या बोगस कागदपत्रांच्या आधारेच दरवर्षी शासनाचे लाखो रुपयांचे अनुदान पदरात पाडून घेतले जात आहे. विशेष म्हणजे, या वाचनालयांची तपासणी करण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित विभागाचे अधिकारी केवळ कागदपत्रांची पूर्तता पाहून अनुदान मंजूर करत असल्याचे दिसून येते. अधिकाऱ्यांच्या या ढिसाळ कारभारामुळेच संस्थाचालकांचे फावले असून, जनतेच्या करातून जमा झालेला पैसा वाचकांपर्यंत न पोहोचता थेट संस्थाचालकांच्या तिजोरीत जमा होत आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील तरुणांना पुस्तकांसाठी तालुक्याच्या ठिकाणी धाव घ्यावी लागते.

# बेलवंडी-लोणी व्यंकनाथ रस्त्यावरील धोकादायक विहिरीला अखेर लोखंडी रेलिंगचे संरक्षण!

**सर्जेराव साळवे। राष्ट्र सह्याद्री**


बेलवंडी-लोणी व्यंकनाथ रस्त्यावरील 'ती' विहीर धोकादायक?
प्रवाशांच्या सुरक्षेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; अपघाताची भीती
प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**दै.राष्ट्र सह्याद्री इफेक्ट**

**बेलवंडी :** बेलवंडी-लोणी व्यंकनाथ या महत्त्वाच्या मार्गावरील प्रवाशांच्या जीवितास धोका ठरत असलेल्या धोकादायक विहिरीची अखेर प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. 'दैनिक राष्ट्र सह्याद्री' मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची तातडीने दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने विहिरीलगत मजबूत लोखंडी क्रॅश बॅरियर (रेलिंग) उभारून नागरिकांच्या सुरक्षेची प्रभावी उपाययोजना केली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो वाहनचालक, शेतकरी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

बेलवंडी ते लोणी व्यंकनाथ या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र रस्त्यालगत असलेल्या मोठ्या उघड्या विहिरीभोवती कोणत्याही प्रकारचे संरक्षक कठडे, लोखंडी रेलिंग किंवा इशारा फलक नसल्यामुळे ती वाहनचालकांसाठी मृत्यूचा सापळाच ठरणार होती. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात विहीर नजरेस न पडल्यास वाहन थेट विहिरीत कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी 'दैनिक राष्ट्र सह्याद्री' ने बेलवंडी-लोणी व्यंकनाथ रस्त्यावरील 'ती' विहीर धोकादायक? या मथळ्याखाली सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्तामध्ये संभाव्य अपघाताचा धोका अधोरेखित करत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती.

वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित हालचाली सुरू करून संबंधित ठिकाणी पाहणी केली. त्यानंतर विहिरीलगत रस्त्याच्या कडेने मजबूत लोखंडी क्रॅश बॅरियर बसविण्यात आले. त्यामुळे आता वाहनचालकांना मोठा आधार मिळाला असून संभाव्य अपघाताचा धोका लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. या मार्गावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने, शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच ग्रामस्थांची ये-जा सुरू असते. त्यामुळे वेळेत करण्यात आलेल्या या सुरक्षात्मक उपाययोजनेचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

# साईसेवा १२,८७२ ठेवीदारांचे ५६ कोटी अडकले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहारात नवे गंभीर दावे समोर येत आहेत. संस्थेचे १२,८७२ ठेवीदार असून त्यांचे सुमारे ५६ कोटी रुपये अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, सहकार आयुक्त, नाशिक यांच्या आदेशानुसार गरजू ठेवीदारांना ३ कोटी रुपयांचे अंतरिम वाटप करण्याचा निर्णय झाला असला, तरी प्रशासक नसल्याने ही प्रक्रिया रखडल्याचा आरोप केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांना सहकार आयुक्त नाशिक यांच्या आदेशानुसार १२,८७२ ठेवीदारांपैकी १० हजार ठेवीदारांना प्रत्येकी १५ हजार रुपये, तर उर्वरित २,८७२ ठेवीदारांना प्रत्येकी १० हजार रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या रकमेतून गंभीर आजारांवरील उपचार, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक खर्च, ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा आणि लग्नकार्यासाठी मदत देण्याचा उद्देश होता. मात्र, प्रशासकावरील कारवाईनंतर गेल्या काही दिवसांपासून कार्यरत प्रशासक नसल्याने हे वाटप रखडल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या प्रकरणात आणखी एक धक्कादायक दावा समोर आला आहे. ठेवीच्या पावत्या तारण ठेवून अनेकांना कर्ज मंजूर करण्यात आले, मात्र त्या मूळ ठेवीच्या पावत्या आजही संबंधित ठेवीदारांकडेच असल्याचा आरोप केला जात आहे.

त्यामुळे तारण म्हणून नोंदविलेल्या पावत्या प्रत्यक्षात संस्थेकडे कशा नव्हत्या, कर्ज मंजुरीची प्रक्रिया कशी झाली आणि संबंधित नोंदी काय आहेत, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.या पार्श्वभूमीवर ठेवीदारांमध्ये संतापाचे वातावरण असून, सर्वसामान्यांसाठी एक नियम आणि राजकीय नेत्यांसह राजकीय प्रभाव असलेल्या व्यक्तींसाठी वेगळा नियम होता का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या सर्व व्यवहारांचे फॉरेन्सिक लेखापरीक्षण करून प्रत्येक कर्ज, तारण आणि आर्थिक नोंदींची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

# तालुक्यात खरिपाच्या ८० टक्के पेरण्या पूर्ण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामातील सुमारे ४९ हजार हेक्टर क्षेत्रापैकी ४२ हजार ६५ हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच सुमारे ८० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मात्र, पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी चिंतेत असून दमदार पावसाअभावी खरीप हंगाम अजूनही धोक्यात असल्याचे चित्र आहे. तालुक्यात पडत असलेल्या तुरळक रिमझिम पावसामुळे उगवून आलेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.मृग व रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्याने पेरण्या रखडल्या होत्या. आर्द्रा व पुनर्वसु नक्षत्रात झालेल्या पावसाचा आधार घेत शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या. सुरुवातीला पाऊस खंडित झाल्यामुळे बहुतांशी भागात मुगाची पेरणीच झाली नाही. परिणामी मुगाच्या लागवड क्षेत्रात मोठी घट झाली आहे. तर सोयाबीनच्या क्षेत्रात वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे. मुगाची पेरणी अवघी साडेतीन हजार हेक्टर क्षेत्रावर झाली आहे तर सोयाबीनची पेरणी वीस हजार हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. सध्या सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे पेरणी झालेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली असली तरी दमदार पावसाची अजूनही प्रतीक्षा कायम आहे.

# रेहेकुरी काळवीट अभयारण्यात ३३ केव्हीची बेकायदेशीर वीजवाहिनी?

## प्रशासन जागे होणार की वन्यजीवांचा बळी जाणार?

**ऋषभ परदेशी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध रेहेकुरी काळवीट अभयारण्याच्या संरक्षित गाभा क्षेत्रातून नागपूरस्थित एका खासगी कंपनीने ३३ केव्ही क्षमतेची उच्चदाब विद्युत वाहिनी आणि विद्युत खांब उभारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या गंभीर प्रकरणामुळे पर्यावरण व वन्यजीव प्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासनाच्या संशयास्पद भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




### नियम धाब्यावर बसवून काम केल्याचा आरोप

तुकाई चारी सिंचन योजनेसाठी वीजपुरवठ्याच्या नावाखाली अभयारण्याच्या अतिसंवेदनशील भागातून १०० अॅल्युमिनियम कंडक्टरसह ३३ केव्हीची मुख्य वीजवाहिनी टाकण्यात आली आहे. पर्यावरणप्रेमी अनिल मारुती लष्करे व हनुमंत लक्ष्मण सुळ यांनी यासंदर्भात संबंधित विभागांकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे.

### तक्रारीनुसार, या उच्चदाब वाहिनीसाठी:

वन विभाग, मुख्य वन्यजीव रक्षक, राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांपैकी कोणत्याही प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्याचा पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे हे संपूर्ण काम बेकायदेशीर असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

### खात्यांचे 'हात वर': मग काम केले कोणी?

विशेष म्हणजे चौकशीदरम्यान महापारेषण, महावितरण आणि जलसंपदा विभाग या सर्वच शासकीय यंत्रणांनी या कामाशी आपला काहीही संबंध नसल्याचे सांगत हात वर केले आहेत.

कोणतीही परवानगी नसताना आणि शासकीय विभागांचा संबंध नसताना अभयारण्याच्या गाभा क्षेत्रात एवढे मोठे काम झालेच कसे? याला जबाबदार कोण?

**– पर्यावरणप्रेमींचा सवाल**

### काळवीट आणि दुर्मिळ पक्ष्यांच्या जीवाला धोका

रेहेकुरी अभयारण्य हे महाराष्ट्रातील काळवीट संवर्धनासाठी अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. अशा अभयारण्यातून उच्चदाबाची वीजवाहिनी गेल्यामुळे काळवीट, स्थानिक पक्षी आणि इतर वन्यजीवांना विजेचा धक्का लागून गंभीर अपघात होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

### मागण्या व प्रशासनाला ७ दिवसांचा इशारा

**तक्रारदारांनी प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:**

तात्काळ गुन्हे दाखल करा: संबंधित खासगी कंपनी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर 'वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२' नुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत. काम तात्काळ थांबवा: अभयारण्यातील वीजवाहिनीचे काम त्वरित बंद करून उभारलेले विद्युत खांब हटवण्यात यावेत. कायदेशीर कारवाईचा इशारा: प्रशासनाने ७ दिवसांच्या आत ठोस कारवाई केली नाही, तर उच्च न्यायालय आणि राष्ट्रीय हरित लवाद येथे जनहित याचिका दाखल केली जाईल.

आता या बेकायदेशीर कामावर प्रशासन तातडीने कठोर कारवाई करून अभयारण्याचे रक्षण करणार, की नेहमीप्रमाणे जबाबदारांना पाठीशी घालणार? याकडे सर्व नागरिक आणि पर्यावरणप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# लाच खोरीमुळे आर्थिक गुन्हे शाखा बदनाम

## पोलीस अधीक्षकांनी द्यावे लक्ष; जनतेची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव येथील बहुचर्चित शेअर मार्केट घोटाळ्याच्या तपासात लाचखोरीचा प्रकार समोर आल्याने जिल्हाभरात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणात लाच मागितल्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्याने आर्थिक गुन्हे शाखा बदनाम झाली असून पोलीस अधीक्षकांनी या तातडीने लक्ष देऊन त्या ठिकाणी नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी होत आहे. लाचखोरी प्रकरणी दिनेश राठोड याला जरी निलंबित केले असले तरी अन्य त्याचे साथीदार आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असल्याचे सध्यातरी दिसून येते.

शेवगाव येथील शेअर मार्केटमध्ये जादा परताव्याचे अमित दाखवून गुंतवणूकदारांची कोट्यावधी रुपयाची फसवणूक झाली होती. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. मात्र तपास करताना फिर्यादी यशवंत पाटेकर यांनाच आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकरवी आरोपी करण्याची भीती दाखवून पैशाची मागणी करण्यात आली होती. हा सर्व प्रकार व्हिडिओ च्या माध्यमातून सगळ्यांसमोर आल्याने आर्थिक गुन्हा शाखा बदनाम झाली. मात्र आर्थिक गुन्हेशाखेत असल्याने अंमलदार दिनेश राठोड आपल्याच मुजोरीत व्यस्त होता. फिर्यादीला व्हाट्सअप कॉल करून पैशांची मागणी करत होता तसेच या व्हिडिओमध्ये डीवायएसपी गणेश उगले यांच्या नावाचा उल्लेख असल्याने त्यांच्यावर काय कारवाई होणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

पोलीसच रक्षकाचा वेश परिधान करून भक्षक होत असतील तर सामान्य जनतेने कुणाकडे दाद मागायची असा प्रश्न उपस्थित होतो. आर्थिक गुन्हे शाखेच्या माध्यमातून या पोलिसांनी किती माया जमवली याचा छडा पोलीस अधीक्षकांनी लावण्याची गरज आहे पोलीस अधीक्षक डीवायएसपी गणेश उगले यांच्यावर काय कारवाई करणार हे येत्या काळात पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी शेवगाव दादेगाव रस्त्यावर गुटख्याचा मोठा साठा पोलिसांनी जप्त केला होता या प्रकरणात एका धनदांडग्याचे नाव एफ आय आर मध्ये न येऊ देण्यासाठी मोठी आर्थिक तडजोड झाल्याची चर्चा रंगली होती. मात्र आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी आपले हात बाहेरच रंगवत असल्याने पोलीस अधीक्षकांना याची इत्यंभूत माहिती नसल्याचे समोर दिसते.

दैनिक **राष्ट्र सह्याद्री**

शुक्रवार दि.२४ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# जिल्ह्यात ४ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सण, उत्सव, विविध कार्यक्रम, मंत्रीमहोदय व इतर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे तसेच जातीय संवेदनशील वातावरणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा महसूल हद्दीत २२ जुलै ते ४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी सुभाष दळवी यांनी हा प्रतिबंधात्मक आदेश पारित केला आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, काठ्या, सोटे, तलवारी, भाले, सुरे, बंदुका तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दगड, क्षेपणास्त्रे किंवा ती फेकण्यासाठी वापरावयाची साधने जवळ बाळगणे, तयार करणे अथवा जमा करणे, कोणत्याही व्यक्तींच्या आकृत्या किंवा प्रतिमांचे प्रदर्शन करणे तसेच दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणे अथवा तयार करणे यावरही बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय जाहीरपणे घोषणा देणे, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक तसेच मानवी आवाजाचे वर्धन करणारी अथवा तो जसा आहे.

तसा ऐकविणारी उपकरणे वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. सभ्यता किंवा नीतिमत्तेला धक्का पोहोचेल अथवा सार्वजनिक शांतता धोक्यात येईल असे कृत्य करणे, आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे, सोंग आणणे तसेच चित्रे, चिन्हे किंवा इतर वस्तू तयार करणे अथवा त्यांचा प्रचार करणे यालाही प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक अथवा खाजगी ठिकाणी सभा घेणे, मिरवणुका काढणे, रस्ता रोको करणे तसेच पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय सेवेतील कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक असलेल्या व्यक्ती तसेच शारीरिक दुर्बलतेमुळे लाठी किंवा काठी वापरणाऱ्या व्यक्तींना हे आदेश लागू राहणार नाहीत.

तसेच अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, धार्मिक मिरवणुका, लग्नसमारंभ व लग्नाच्या मिरवणुकांना या आदेशातून वगळण्यात आले आहे. संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक अथवा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची रीतसर परवानगी घेतलेल्या सभा व मिरवणुकांनाही या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

## सोनेवाडीतील वस्तीवर चोरीचा प्रयत्न रहिवाशांच्या सतर्कतेने फसला



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी परिसरात चोरट्यांचा वाढता धुमाकूळ नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत असून गुरुवारी पहाटे फटांगरे वस्तीवरील चोरीचा प्रयत्न रहिवाशांच्या सतर्कतेमुळे फसला. मागील महिन्यात याच परिसरात एकाच दिवशी तीन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरुवारी पहाटे सुमारे ३.१५ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी बाबासाहेब राधाजी फटांगरे यांच्या घराचे कुलूप कटावणी व फाण्याच्या साहाय्याने तोडले. घराचे दोन्ही दरवाजे बाहेरून बंद करून अंगणातील विद्युत दिवेही काढून घेतले. त्यापूर्वी त्यांनी शेतात राहणाऱ्या मजुराच्या घराचीही उचकापाचक केली; मात्र तेथे काहीही हाती लागले नाही. घरात प्रवेश करताना सागवानी दरवाज्याचा आवाज झाल्याने बाबासाहेब फटांगरे यांना जाग आली. त्यांनी तत्काळ मुलगा निलेश फटांगरे व कुटुंबीयांना उठवून आरडाओरडा केला. आवाज ऐकून शेजारी चांगदेव फटांगरे व राजेंद्र फटांगरे मदतीला धावले. त्यामुळे चोरट्यांनी चोरीसाठी आणलेले साहित्य घटनास्थळीच टाकून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे यांनी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर पोलीस निरीक्षक गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल अनिस शेख, गोपनीय विभागाचे प्रमुख राम खारतोडे व पोलीस पाटील दगू गुडघे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे परिसरात पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## कुऱ्हाडीने हल्ला करून सोन्याचे दागिने लांबवले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : तालुक्यातील देऊळगावसिद्धी येथे पूर्ववैमनस्यातून एका कुटुंबावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली आहे. या हल्ल्यात दोघे जण गंभीर जखमी झाले असून, हल्लेखोरांनी गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र तोडून पळ काढला. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देऊळगावसिद्धी परिसरामध्ये १८ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. श्रीमंत जीवलाल चव्हाण आणि अनिता श्रीमंत चव्हाण (दोघे रा. देऊळगावसिद्धी) यांनी जुन्या वादातून अनिता भोसले यांच्या घरासमोर जाऊन वाद घातला. वादाचे रूपांतर हिंसाचारात होऊन आरोपींनी कुऱ्हाडीने थेट डोक्यात वार केले. या हल्ल्यात अनिता भोसले आणि त्यांचा मुलगा संकेत भोसले हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. हल्ल्यादरम्यान आरोपींनी लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करत शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र जबरदस्तीने तोडून नेले. या घटनेनंतर परिसरात मोठा खळबळ उडाली आहे. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवला आहे. घटनेचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहा. फौजदार गुंजाळ करत असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

## भंडारदरा धरणातून १ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग;

### प्रवरा नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे गुरुवार (दि. २३ जुलै) रोजी दुपारी ३.३० वाजल्यापासून भंडारदरा धरणातून १,००० क्युसेक पाण्याचा विसर्ग प्रवरा नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण वाढल्यास या विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने जलसंपदा विभागाने प्रवरा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग (मुख्यालय लोणी) यांनी जारी केलेल्या सूचनेनुसार, अकोले, संगमनेर आणि ओझर बंधाऱ्याखालील तसेच राहाता, राहुरी, श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यातील प्रवरा नदीकाठच्या गावांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नदीपात्रात किंवा नदीकाठी असलेले शेतीसाहित्य, जनावरे तसेच इतर मौल्यवान वस्तू तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. जलसंपदा विभागाने संबंधित महसूल, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाला आवश्यक ती दक्षता घेण्याचे निर्देश दिले असून, परिस्थितीनुसार विसर्गात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांवरच अवलंबून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वंचितच्या 'महाराष्ट्र बंद' हाकेला नेवासा शहरासह तालुक्यात संमिश्र प्रतिसाद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर नीट पेपरफुटी विरोधात शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीमार आणि पोलिसांच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने गुरुवार (दि.२३) जुलै रोजी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिलेली होती या आवाहनाला नेवासा शहरासह तालुक्यातून संमिश्र प्रतिसाद मिळाला. गुरुवारी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने पोलिसांच्या लाठीमाराचा निषेध नोंदवित दिल्लीत आंदोलन करणाऱ्या निष्पाप विद्यार्थ्यांवर आणि महिलांवर झालेल्या निर्दयी मारहाणीचा तीव्र निषेध करून नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा अशी मागणी यावेळी वंचित बहुजन आघाडीकडून करण्यात आली.

## खंडणीसाठी चिकन व्यावसायिकास बेदम मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहराजवळील गोंधवणी परिसरातील एका चिकन व्यावसायिकाकडे दरमहा २० हजार रुपयांची खंडणी मागत हॉकी स्टिक, लाकडी दांडके व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पाच नामनिर्देशित आणि दोन अनोळखी अशा सात जणांविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमी व्यावसायिकावर साखर कामगार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत तौसीफ समीर पठाण (वय ३१, रा. गोंधवणी, श्रीरामपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, फतेह चौक परिसरातील 'आझाद चिकन शॉप'मध्ये ते भाऊ असीम पठाण यांच्यासह व्यवसाय करतात. २० जुलै रोजी अमन आयुब शेख व शाहरुख उर्फ गोव्या बागवान यांनी दुकानात येऊन दरमहा २० हजार रुपये देण्याची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर दोघांनी धमकी देत तेथून निघून गेले. त्यानंतर रात्री साडेदहाच्या सुमारास दुकान बंद करत असताना आरोपी पुन्हा आले. अमन आयुब शेख याने हॉकी स्टिकने, तर शाहरुख उर्फ गोव्या बागवान याने लाकडी दांडक्याने मारहाण केली. इतर आरोपींनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर दुखापत केली. तसेच, यापुढे चिकन शॉप सुरू केल्यास जीवे मारून टाकण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी अमन आयुब शेख, अमन आसिफ शेख, शाहरुख उर्फ गोव्या बागवान, रेहान राजू शेख, आवेज कुरेशी व दोन अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## शिर्डीत गुटखा विक्रेत्यावर पोलीसांची धाड

### लाखो रुपयांचा गुटखा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : येथील पोलीस स्टेशनने गुटखा विक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाई सुरू करत शहरातील दोन ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून दोघांना ताब्यात घेतले असून लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला आहे. या कारवाईमुळे गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांच्या आदेशानुसार शहरात सुरू असलेल्या बेकायदेशीर गुटखा विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यानुसार एचसी गोमसाळे, पोलीस शिपाई विकी त्रिभुवन, पोलीस शिपाई आकाश चव्हाण आणि पोलीस शिपाई सतपाल शिंदे यांच्या पथकाने पहिली कारवाई धनतारा रोडवरील शेळके मार्केटसमोरील टपरीवर केली. येथे छापा टाकून संजय दळवी याला ताब्यात घेत लाखांचा रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. तसेच साईबाबा कॉम्प्लेक्ससमोरील पोस्ट ऑफिसजवळ दुसरी कारवाई करत तैखान पठाण (रा. कचरा डेपो शेजारी) याच्याकडूनही मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या दोन्ही प्रकरणांत संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## माका येथे घरफोडी; ७.९५ लाखांचा ऐवज लंपास, चोरटे पसार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**सोनई** : नेवासा तालुक्यातील माका येथील आखाडे वस्तीवर अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे ७ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, (दि.२२) जुलै रोजी रात्री साडेनऊ ते ( दि.२३) जुलै रोजी पहाटे ५.४५ वाजण्याच्या दरम्यान माका येथील आखाडे वस्तीवरील राहत्या घराच्या खिडकीची तोडफोड करून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला.

त्यानंतर घरातील कपाटाची उचका पाचक करून त्यातील ७ लाख १५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने तसेच ८० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ७ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी अभिषेक साहेबराव आखाडे (वय ३१, रा. आखाडे वस्ती, देडगाव रोड, माका) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा र. नं. ३२६/२०२६ नोंद करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता (बी. एन.एस) कलम ३३१(३), ३३१(४) व ३०५(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव करीत आहेत. या घटनेमुळे माका परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, चोरट्यांचा तातडीने शोध घेण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

**सोनई पोलीस ठाण्यात नुकतेच रुजू झालेले डॅशिंग व कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव यांच्याकडे या घरफोडीच्या घटनेचा तपास असून ते या चोरांच्या टोळीचा कसून शोध घेत आहेत.**

## श्रीरामपूरमध्ये गोवंश कत्तल तस्करी उघड

### ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक आणि कत्तलीसाठी नेण्याचे प्रकार रोखण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत, स्थानिक गुन्हे शाखेने श्रीरामपूर शहरात मोठी कारवाई केली आहेत.

कत्तलीसाठी अत्यंत क्रूरपणे डांबून नेली जाणारी गोवंशीय जनावरे पोलिसांनी सुखरूप सोडवली असून, या कारवाईत एकूण ७ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार (दि.२२ ) जुलै रोजी मिल्लत नगर ते गोंधवणी रोड परिसर, श्रीरामपूर येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, पोलिसांनी मिल्लत नगर ते गोंधवणी रोड शिवारात सापळा रचून गस्त घातली.

यावेळी संशयितरीत्या जाणाऱ्या एमएच–०५ डीके–०६६१ क्रमांकाच्या पिकअप वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये गोवंशीय जनावरे अत्यंत दाटीवाटीने व क्रूरपणे कत्तलीसाठी नेली जात असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी तात्काळ वाहन चालक आबासाहेब विलास काळे याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान, ही जनावरे समीर बिलाल कुरेशी, वसीम अय्युब कुरेशी आणि सादिक फरीद कुरेशी यांच्या सांगण्यावरून कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याची माहिती समोर आली.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार विशाल तनपुरे यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७१८/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या ओरापीविरोधात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम, १९९५ (सुधारित २०१५)प्राण्यांना निर्दयतेने वागविणे प्रतिबंधक कायदा यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.सध्या श्रीरामपूर शहर पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील कसून तपास सुरू आहे.

या तपासा कामी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने ही धडक कारवाई केली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव तसेच पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, भगवान थोरात, रमिझराजा आतार आणि विशाल तनपुरे यांनी कारवाई केली.

### आरोपीकडून एकुण केलेला जप्त मुद्देमाल

या आरोपीकडून ७,३५,००० रुपये (१,३५,००० किमतीची जनावरे, ६,००,००० किमतीची पिकअप गाडी) असा एकूण सात लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आबासाहेब विलास काळे (वय ३५, रा.वडगाव निपाणी, ता. श्रीरामपूर) यास ताब्यात घेतले असून, समीर बिलाल कुरेशी, वसीम अय्युब कुरेशी आणि सादिक फरीद कुरेशी (सर्व रा. कुरेशी मोहल्ला, श्रीरामपूर) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली.

## भक्तासाठी भीवरेचा श्रीविठ्ठल उभा प्रवरातीरी... माझी बिल्वपुरी पंढरी ..!!

श्रीरामपूर तालुक्यातील प्रवराकाठची बेलापूर बु||, बेलापूर खुर्द (बन ) आणि उक्कलगाव ही त्रिस्थळी अत्यन्त पवित्र भूमी मानली जाते. श्री केशव -गोविंदाच्या या त्रिस्थळीला पौराणिक संदर्भ आहे. तसेच भीमातीरीच्या पंढरीचा विठ्ठल आणि प्रवरातीरीचे केशव -गोविंद यांच्या संबंधालाही पौराणिक संदर्भ आहेत . त्याबाबत आजच्या आषाढी एकादशीचे औचित्य साधून घेतलेला हा मागोवा* --

पुराण कथेनुसार पार्वती मातेची तहान शमविण्यासाठी बिल्व वनात शिवशंकरांनी बेलाचे पान जमिनीवर टाकताच तेथे एक तळे निर्माण झाले. उभयतांनी त्याला *बिल्वतीर्थ* (सध्याचा बेलापूर परिसर ) असे नाव दिले. कालांतराने त्रिपुरासुराच्या वधासाठी भगवान विष्णूंसहीत सर्व देवतांनी याच बिल्वतीर्थावर पूर्वेला आपआपल्या नावांनी शिवलिंगांची स्थापना करून शिवाराधना केली. शिवाज्ञेने बिल्वतीर्थाच्या दुसऱ्या - पश्चिम- तटावर इंद्रदेवांनी व श्री विष्णूंनी आणखी दोन शिवलिंगे स्थापन केली . त्यांना अनुकमे *केशव व गोविंद* अशी नावे दिली. बिल्ववनात श्री विष्णूंनी स्थापन केलेल्या एकाच लिंगाला ' हरिहर, केशव आणि गोविन्द ' अशी तिन्ही नावे महादेवांनी सहर्ष मान्य केली होती . अशाप्रकारे बिल्वतीर्थाच्या उभय तटावरील ही शिवलिंगे म्हणजेच आजचे बेलापूर खुर्द (बन ) व उक्कलगाव येथील श्री. हरिहर केशव - गोविंद दैवते होत. स्कंद पुराणातील वर्णनाप्रमाणे, पुढे इ.स. ११०० च्या सुमारास तांबे कुळात माळी वंशात उक्कलगावी, नगू व डांगू नामक दोन हरिभक्त जन्माला आले. पितृ आज्ञा घेऊन तरुणपणा पासून दोघेजण प्रतिवर्षी पंढरीस विठ्ठल दर्शनास जावू लागले. पुढे वार्धक्याने शरीर थकले तरी कसेबसे दोघे पंढरीस पोचले . परततांना विठुरायाने दिलेल्या स्वप्न दृष्टांताप्रमाणे देव त्यांच्या सोबत त्यांच्या घरी आले आणि दोन बालकांच्या रुपात नैवेद्य ग्रहण करून गेले. कालांतराने, तळमळ लागलेल्या भक्तांना देवांनी दोन बालबटू- स्वरूपात दर्शन दिले आणि देव अदृष्य झाले. तेव्हा शोकार्त झालेल्या नगू-डांगूना स्वतः महादेवांनी दिलेल्या दृष्टांताप्रमाणे प्रवरानदीत वाहत आलेल्या चंदन स्तंभांची *बेलापूर बन* येथे त्यांनी स्थापना केली . श्री विठ्ठल हरिहरात्मक बटू-रूपात 'केशव -गोविंद'



अध्याय नववा - भक्तवर्य नगू - डांगूंना श्रीहरिहरांचे बटुरूपात दिव्य दर्शन (श्रीक्षेत्र बन)

नावाने उभे राहिले व भक्तराज नगू - डांगूंच्या घरी यात्रेच्या मावद्याच्या वेळी जेथे देव बटू रूपात जेवले तेथेही दोन चंदन स्तंभांची स्थापना करण्यात आली. ते ठिकाण म्हणजे *उक्कलगांव*.

पुढे काही वर्षांनी, प्रवरा नदीतीरावरील बेलापूर बुद्रुक या ठिकाणचा केशव लोखंडे ( तारु ) हा भक्त तरुणपणापासून, प्रति सोमवारी पोहून बनात दर्शनास जात असे . याचा हा नेम कधी चुकला नाही .तोही वार्धक्याने थकला . एका सोमवारी दुथडी भरलेल्या प्रवरेत त्याने उडी मारली. तो पट्टीचा पोहणारा असूनही थकल्यामुळे आता बुडू लागला . आर्त स्वराने त्याने देवाचा धावा केला तेव्हा महादेवांनी त्याला हाताला धरून पैलतीरावर आणले. इथून पुढे तू बनात दर्शनाला येऊ नकोस, आम्हीच तुझ्या सोबत तुझ्या गावी ( बेलापूर बुद्रुक येथे ) येतो. मात्र मागे वळून पाहू नकोस , असे सांगितले . परततांना भक्ताला शंका आली, त्याने मागे वळून पाहिले . तेव्हा देव जागेवरच थांबले . त्याठिकाणी कडुलिंब व पिंपळ वृक्ष उगवले. ते विसाव्याचे ठिकाण अजून या प्रसंगाची साक्ष देते आहे . भक्त खिन्न झाला . ' चुकलो देवा, चला ' असे म्हणाला . देव म्हणाले, उद्या सूर्योदयी प्रवरा प्रवाहात दोन चंदनी स्तंभ वाहत येतील, त्यांची इंद्रबिल्वेश्वर शिवलिंगा- सन्निध स्थापना कर . घडलेही तसेच. अशा रीतिने *बेलापूर* *बुद्रुक* येथेही केशव गोविंद स्तंभ रूपात उभे राहिले .

या तिन्ही हरिहर क्षेत्रांची दर्शन परिक्रमा केल्यास त्या भक्तास काशी यात्रेचे पुण्य मिळते, अशी श्रद्धा असल्यामुळे दूरवरून भक्तगण आषाढी/ कार्तिकी एकादशी, महा- शिवरात्र, तसेच श्रावणी सोमवारसह संपूर्ण श्रावण महिनाभर दर्शनास येतात. द्वारकेचा राणा व्दारकेहून पंढरीस आला , भक्तांसाठी चंद्रभागेतीरी उभा राहिला. तोच परमात्मा पंढरीहून प्रवरातीरी बिल्वतीर्थाच्या सान्निध्यात बन - उक्कलगाव येथे उभा राहिला. तोच परमात्मा तेथून बेलापूर बु ।। येथे येऊन भक्तासाठी *केशव* *गोविंद* रूपात आजही उभा आहे.असा हा बिल्व- क्षेत्रीच्या त्रिस्थळीचा महिमा , आणि पंढरीचा विठ्ठल आणि प्रवरातीरीच्या हरिहर केशव - गोविंद यांचा पौराणिक संदर्भ आहे.

**संदर्भ - श्री मोहनबुवा वासुदेवबुवा खानवेलकर यांनी लिहिलेला ''श्री केशव गोविंद माहात्म्य ग्रंथ''**

**भास्कर खंडागळे-९८९०८४५५५१**